वर्ष : सातवे, अंक : तिसरा (द्वैमासिक) जानेवारी-फेब्रुवारी २००६ मूल्य रु. २५/-

संपादक
**हेमंत दिवटे**

व्यवस्थापन/जाहिरात
**स्मृती दिवटे**

संपादकीय / व्यवस्थापकीय संपर्क
**हेमंत दिवटे**
संपादक 'अभिधानंतर'
१७०१/१७०२ ६ए,
व्हीस्परिंग पाम्स,
लोखंडवाला टाऊनशिप,
कांदिवली (पूर्व),
मुंबई - ४०० १०१
फोन : (०२२) ५६९२०३२०
Email : poetrywala@hotmail.com

**वाईट कवितेविषयी थोडं** ७
सचिन केतकर

**इज इट इन योर डीएनए?** १०
मिनाक्षी राजेंद्र पाटील

**१० मिन्टांची कविता** १८
गणेश आत्माराम वसईकर

**दुसऱ्या नवतेच्या**
**समर्थ कवीचा सन्मान : ज्ञानपीठ** ३१
श्रीधर तिळवे

| | | |
|---|---|---|
| **वार्षिक वर्गणी** | **:** | **रुपये १५०/-** |
| **त्रैवार्षिक वर्गणी** | **:** | **रुपये ४००/-** |
| **आजीव सभासद** | **:** | **रुपये ५०००/-** |

आता
द्वैमासिक

हे द्वैमासिक अभिधानंतर प्रकाशनासाठी मुद्रक/प्रकाशक/संपादक हेमंत दिवटे यांनी न्यू एज प्रिंटिंग प्रेस, भूपेश गुप्ता भवन, ८५ सयानी रोड, मुंबई - ४०० ०२५ येथे छापून १७०१/१७०२ ६ए, व्हीस्परिंग पाम्स, लोखंडवाला टाऊनशिप, कांदिवली (पूर्व), मुंबई - ४०० १०१ येथून प्रकाशित केले.

या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या साहित्यातील मतांशी 'अभिधानंतर'चे मुद्रक/प्रकाशक/संपादक सहमत असतीलच असे नाही.

## प्रसिद्ध झाले

# अभिधानंतरचे दोन दणदणीत कवितासंग्रह

## दर साल दर शेकडा

वीरधवल परब




जागतिकीकरणाच्या प्रक्रियेतून सुरू झालेले हितसंबंधांचे राजकारण, दर क्षणी स्वत:चे भ्याडपण झाकण्यासाठी होणारी धडपड, अध्यात्माच्या लाटेत गरगरणारे अज्ञ जन, सांस्कृतिक परिक्षेत्रात घुसलेला दहशतवाद यांमध्ये कवी स्वत:चे सत्व जपू पाहतो. म्हणूनच कवीचा हा आतला आवाज, सर्वशक्तीनिशी उभारून येणाऱ्या संवेदनशील व्यक्तीचा 'प्रातिनिधिक' आवाज आहे.

## रिसायकलिंगची वेळ झालीय

मोहन बोरसे




संस्कृतीला ठोकळेबाज, आत्मकेंद्री वा चंगळवादी बनवणाऱ्या जागतिकीकरणाच्या महाकाय प्रक्रियेमध्ये स्वत:ची स्वतंत्र ओळख आणि माणूसपणा जपण्यासाठी धडपडणाऱ्या कवीची घुसमट वा गोची ह्या कवितांमधून व्यक्त होते. पण ही कविता तिच्या तांत्रिक हुन्नरामुळे अनेक प्रकारे वाचता येत असल्यामुळे ती फक्त आत्माभिव्यक्ती राहात नाही, तर समकालीन माणसाच्या कोंडीला वाचा देते.

**२८ फेब्रुवारी २००६ पर्यंत दोन्ही संग्रह २५% सवलतीत उपलब्ध**

अभिधानंतर प्रकाशन

१७०१/१७०२, ६ए-व्हीस्परिंग पाम्स, लोखंडवाला टाऊनशिप
कांदिवली (पूर्व), मुंबई ४०० १०१ ● दूरध्वनी : (०२२) ५६९२०३२०
Email : poetrywala@hotmail.com ● poetrywala@gmail.com

# संपादकीय

'अभिधानंतर'च्या ह्या अंकापासून अभिधानंतर द्वैमासिक म्हणून आपल्या समोर येतंय. सुमारे सात वर्षे 'अभिधानंतर' त्रैमासिक होतं. पहिल्या अंकापासूनच जागतिकीकरण, त्याचं स्वरूप, परिणाम, मराठी कवितेत ते कसं येतंय, किंवा का नाही आलंय, समस्या, उपाय, वगैरे उलटसुलट गोष्टींचा विचार 'अभिधानंतर' मध्ये आला. त्रैमासिकाचा शेवटचा अंक 'जागतिकीकरण आणि संस्कृती विचार' (दिवाळी २००५) या अंकाबरोबरच सात वर्षे चाललेल्या चर्चेचा शेवट झाला. अर्थात त्यावेळी द्वैमासिक करायचं जरी डोक्यात होतं तरी ते कितपत शक्य आहे याचा अंदाज नव्हता त्यामुळे ते जाहीर करू शकलो नाही. आता, अनेक मित्रांशी बोलून द्वैमासिक शक्य आहे, म्हणजे तेवढं नवं लेखन मिळू शकतं असं वाटल्यामुळे आणि इतरही ताळेबंद शक्य होतील असं वाटल्यामुळे या अंकापासून वर्षभरात पाच अंक द्यायचे ठरवलं आहे. म्हणजे दिवाळी अंक हा जोड-अंक आणि ४० ते ४८ पानांचे इतर चार अंक.

द्वैमासिक स्वरूपात 'अभिधानंतर' प्रसिद्ध करतांना गेली सात वर्षे नेटाने लावून धरलेला जागतिकीकरण वगैरे वगैरेवरील फोकस आता उत्तर-जागतिकीकरणाकडे / विस्ताराकडे वळवण्याचा उद्देश आहे. तसेच फ्रेश कविता-कथा लिहिणाऱ्या, लिहू शकणाऱ्या तरुणांना अभिधानंतर त्यांचंच व्यासपीठ वाटावं असं स्वरूप ठेवायचा विचार आहे. जिला आपण जागतिकीकरणातली, नव्वदोत्तरी, चौथ्या नवतेची वगैरे कविता म्हणतो त्या कवितेला 'अभिधानंतर'ने गेली सात वर्षं 'फोकस'मध्ये ठेवलं, तिचं महत्त्व पटवून दिलं आहे. अर्थात येत्या अंकांमध्ये अशा कवितेची समीक्षा व तशी कविताही प्रसिद्ध होईल. पण त्याचबरोबर नव्या तरुण कवींच्या थोड्या कच्च्यासुद्धा कविता/कथा तसेच इतर भाषेतून मराठीत अनुवादीत साहित्य अग्रक्रमाने छापायचा विचार आहे. तुम्हां वाचकांना काय वाटतं ते तुम्ही कळवावं. लेखनसहाय्य मिळावं ही अपेक्षा.

सदर अंकात नव्यांचा शोध घ्यायचा म्हणून 'अभिधानंतर'ने आयोजित केलेल्या काव्य-स्पर्धेचा निर्णय आहे. मीनाक्षी पाटील यांच्या ज्या कवितेला पुरस्कार दिला गेलाय ती 'इज इट इन योर डीएनए' ही कविता छापली आहे. सचिन केतकरने तरुण कवींसाठी खास असा छोटा लेख लिहून दिला, तोही या अंकात आहे. विंदा करंदीकरांना ज्ञानपीठ मिळालं म्हणून श्रीधर तिळवेकडून एक लेख लिहून घेतला होता. दरम्यान 'खेळ'मध्ये सलील वाघचा 'जोरदार' लेख छापून आला. त्यातील अनेक मतं आम्हाला पटली, काही नाही पटली. तरीही त्या लेखाची चर्चा व्हायला हवी म्हणून श्रीधरकडून 'पुरवणी' लिहून घेतली, हे सर्व या अंकात आहे.

विंदांना ज्ञानपीठ, 'भिजकी वही'ला साहित्य अकादमी, 'अभिधानंतर'ला 'महाराष्ट्र फाउण्डेशन' असे पुरस्कार मराठी कवितेला मिळाले. तीन पिढ्यांतल्या तीन कवितांना पुरस्कार मिळाले. पुरस्कार मिळाले म्हणजे आपलं काम संपलं असं अनेक पुरस्कार देणारे व घेणारे समजत असावेत. कदाचित फाउण्डेशनवाल्यांनाही 'नव्वदोत्तरी/जागतिकीकरणातली कविता/चौथ्या नवतेची कविता' यासाठी अभिधानंतरने केलेलं काम आता संपलं हे अगोदरच समजलेलं असावं. म्हणूनच आता जोमाने नव्या वाटा धुंडाळत पुढं जायला हवं आणि तुमच्या सहकार्याशिवाय हे शक्य नाही.

धन्यवाद.

सस्नेह नमस्कार,

तुमचा-माझा पत्रपरिचय विलंबानेच होतो आहे, याचा खेद वाटतो. वस्तुत:, 'अभिधानंतर' ह्या अंकाचा मी सातत्याने वाचक आहे. विशेषत: मराठीतल्या बदलत्या आणि नव्या प्रतिभावंतांच्या अंतर्मुख करणाऱ्या, सहज पण प्रयोगात्म कविता मोठ्या प्रमाणात आपल्याच अंकात प्रामुख्याने वाचायला मिळतात. गेल्या तपापासून मराठी कवितेची रूपात्म आणि आशयात्म अंगे झपाट्याने बदलत आहेत. काही अस्वस्थ करणाऱ्या आणि काही चकवा देणाऱ्याही कविता वाचायला मिळतात. हा भागही स्वाभाविक आणि स्वीकारार्हच ठरतो.

विशेष म्हणजे, ह्या वाङ्मयप्रकाराच्या अनुषंगाने जगातील बहुरूपी परिवर्तनाचा आणि सगळ्याच सांस्कृतिक अंगोपांगांचा विचार करणारे आणि त्याबद्दलची आपली मतमतांतरे निर्भीड मोकळेपणाने नोंदविणारे अभ्यासक आणि संपादकही आपल्या अंकातच आढळतात. ही बाब मला खूपच महत्त्वाची वाटते. कारण प्रथम संवाद घडणे अगत्याचे, असते तो शब्दबद्ध होणे त्याहूनही मोलाचे असते. हाताशी लिखित असले तरच, त्याबाबत अन्य कविताप्रेमी व्यक्तीला आपलीही मते नेमकेपणाने नोंदवणे शक्य आहे.

आपल्या प्रकाशन संस्थेनेही सातत्याने नवे कवी ग्रंथरूपात आणण्याचा जो उपक्रम चालविला आहे, त्याचेही मला विशेष वाटते. खूप आधी मित्रवर्य अशोक शहाणे हे कार्य करीत होते. आणि त्याआधीही श्री. ना. वि. काकतकर यांच्या 'रहस्यरंजन' मासिकाभोवतीही एक वलय होते. त्याबद्दल तुमचे अभिनंदन करायला हवे. नव्या कवितेचा आवाज अधोरेखित करण्याच्या ह्या कामगिरीला भविष्यकाळात मोठे मोल असेल. तुमच्या संग्रहातील काही कविताही मला भावल्या आहेतच. वस्तुत: विविध वृत्तींच्या, विविध स्तरांतील ह्या नव्या कवींबद्दल कोणीतरी डोळस रसिकतेने लिहिणे ही काळाची गरज आहे असे मला वाटते. कलावंत आणि अभ्यासक समबल, समकक्ष फुलायला हवेत.

सत्तरीच्या दशकात दिलीप चित्रे, रा. ग. जाधव, द. भि. कुलकर्णी, निशिकांत ठकार, वसंत आबाजी डहाके आणि मी स्वत: त्या काळातील कवींबद्दल क्षमतेप्रमाणे खूप लिहिले होते. माझ्या पत्रविलंबाबाबत पुनश्च दिलगिरी व्यक्त करतो. आपणास व उपक्रमास मनोमन शुभेच्छा.

कळावे,

आपला,
केशव मेश्राम

■

सस्नेह नमस्कार

महाराष्ट्र फाउण्डेशनचा, नियतकालिकांसाठीचा मानाचा पुरस्कार यंदा तुमच्या 'अभिधानंतर'ला मिळाल्याचे वाचून आनंद वाटला. मन:पूर्वक अभिनंदन! तुमचा दिवाळी अंकही खूप छान निघाला आहे. अंक चांगला काढण्यासाठी केवढी धडपड करावी लागते हे मी कित्येक वर्षे अनुभवतो आहे. तुम्हीही केवढ्या प्रयत्नांनी 'अनं'चे सकस अंक काढीत आहात-याची कल्पना येते. शुभेच्छा! 'क' दिवाळी अंक मिळाला ना?

तुमचा,
पुपा'जी'
(पुरुषोत्तम पाटील)

■

स.न.

'अभिधानंतर'ला 'महाराष्ट्र फाउण्डेशन'चा पुरस्कार मिळाल्याबद्दल आपलं मन:पूर्वक अभिनंदन! नियतकालिकांच्या आयुष्यात अशा घटना नेहमी सुखद असतात. काही वेळा प्रेरकही. कळावे.

आपला,
गंगाधर पानतावणे (अस्मितादर्श)

■

नमस्कार

महाराष्ट्र फाउण्डेशन पुरस्कार मिळाल्याबद्दल तुमचं आणि त्याहीपेक्षा तुमच्या कुटुंबियांचं हार्दिक अभिनंदन. कुटुबियांचं अशासाठी, की तेच खरं तर अंक दुमडणे, पत्ते-स्टॅम्प चिटकविणे, पोस्टात टाकणे, पुस्तकांचा, अंकाचा ढीग सावरणे, कचरा साफ करणे आदी अतिशय महत्त्वाची तरीही लोकांच्या दृष्टीने बिनमहत्त्वाची कामं करीत असतात. मी अनुष्टुभ्‌चं गेली अनेक वर्ष काम करीत असल्यामुळे त्यात कुटुंबाचा वाटा किती महत्त्वाचा असतो हे मला चांगले माहीत आहे. असो अभिधानंतर उत्तम रित्या प्रसिद्ध होत आहे, याचा आम्हाला आनंद आहेच. (अनुष्टुभ्‌चे गो. तु. पाटील यांनी फोनवर कळविलेल्या प्रतिक्रियेचा सारांश)

■

अभिधानंतरच्या दिवाळी अंकासंबंधी आणि महाराष्ट्र फाउण्डेशन पुरस्कार मिळाल्याबद्दल अनेक वाचकांचे, मित्रांचे, हितचिंतकांचे फोन, ई-मेल्स, पत्र, SMS मिळाले. ते सर्व इथे प्रसिद्ध करू शकत नाही. तुमच्या प्रेमाबद्दल आणि आपुलकीबद्दल आम्ही आपले आभारी आहोत.

संपादक

■

*(आणि असंही एक पत्र ↓ )*

सस्नेह नमस्कार

'अभिधानंतर' कविता लेखन स्पर्धा माहितीपत्रक मिळाले. ११ चांगल्या कवितांना प्रत्येकी १००० रुपयांची पुस्तके पारितोषिक म्हणून देण्यात येणार आहेत. ही योजना आवडली नाही. पुस्तकांचा काही उपयोग नाही. रद्दी म्हणून पडून राहतात. १०० रुपये प्रवेश शुल्कासह आम्ही कविता पाठवू. म्हणजे एका कवितेला १०० रुपये. कविता निवडली नाही तर वर्षातले फक्त ४ अंक वर्गणीदार म्हणून पाठवणार. चला हे मान्य केलं, पण जर आमची कविता ११ मध्ये निवडली गेली तर पुस्तकं नको Cash द्या. बरं अंकाचा एखादा नमुना पाठवा ना! पाहू अंक तरी कसा आहे? मी कविता पाठवते. पण मुंबईत ती By Hand दिली तर चालेल का? खरं तर एकाच कवीच्या एकाच कवितेला २५ हजार पारितोषिक देणं चूक आहे. त्यापेक्षा २५ कवींच्या एकेका कवितेला १००० दिले असते तरी चाललं असतं. तुमचं लोकांनी नाव काढलं असतं.

मी इथे ना. धों. महानोर, श्री. दि. इनामदार, फ. मु. शिंदे, लक्ष्मीकांत तांबोळी-सर्वांना तुमच्या कविता लेखनाचं छापील पत्रक दाखवलं. सर्वांनी वाचलं आणि मला सांगितलं की एकाच कवीच्या एकाच कवितेला १० हजार देणं योग्य नाही. बाकीच्यांना पुस्तकं आणि एकाला Cash ही संकल्पनाच बरोबर नाही. असो, मी १०० रुपये भरून माझी कविता पाठवते, पण बक्षीस मिळालं तर Cash द्या. पुस्तकं नको.

दिवाळीच्या शुभेच्छा.

डॉ. उषा गुजराथी

■

## 'अभिधानंतर'च्या प्रकाशनासंबंधी माहिती

### निवेदन फॉर्म नं. ४

| | | |
|---|---|---|
| प्रकाशन स्थळ | : | मुंबई |
| प्रकाशनाचा काळ | : | द्वैमासिक |
| मुद्रकाचे नाव | : | हेमंत दिवटे |
| राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| पत्ता | : | १७०१/१७०२ ६ए, व्हीस्परिंग पाम्स, लोखंडवाला टाऊनशिप, कांदिवली (पूर्व), मुंबई - ४०० १०१ |
| प्रकाशकाचे नाव | : | हेमंत दिवटे |
| राष्ट्रीयत्व | : | वरीलप्रमाणे |
| पत्ता | : | वरीलप्रमाणे |
| संपादकाचे नाव | : | हेमंत दिवटे |
| राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| द्वैमासिकाची मालकी | : | अभिधानंतर प्रकाशन |

मी, हेमंत दिवटे जाहीर करतो की, वरील माहिती माझ्या माहितीप्रमाणे व समजुतीप्रमाणे खरी आहे.

प्रकाशकाची सही

**हेमंत दिवटे**

# ‘अभिधानंतर’चे दर्जेदार कवितासंग्रह

- ❖ **वर्जेश ईश्वरलाल सोलंकीच्या कविता** (रु.५०/-)
- ❖ **अंतरीचा भेद** / प्रदीप पाटील (रु. ६०/-)
- ❖ **तसा काहीच अर्थ नाही** / देविदास चौधरी (रु. ५०/-)
- ❖ **श्रमिष्टाचा जाहीरनामा** / संतोष पद्माकर पवार (रु. ६०/-)
- ❖ **भिंतीशिवायच्या खिडकीतून डोकावताना** / सचिन केतकर (रु. १००/-)
- ❖ **महासत्तेचे पीडादान** / महेन्द्र भवरे (रु. ५०/-)
- ❖ **चौतिशीपर्यंतच्या कविता** / हेमंत दिवटे (रु. १००/-)
- ❖ **ऑल दॅट आय वान्ना डू** / संजीव खांडेकर (रु. ७५/-)
- ❖ **रिसायकलिंगची वेळ झालीय** / मोहन बोरसे (रु. १००/-)
- ❖ **दर साल दर शेकडा** / वीरधवल परब / (रु. १००/-)

**वरील कवितासंग्रह २५% सवलतीत उपलब्ध !**

## आगामी कवितासंग्रह

**ज्याम मज्या**

मन्या जोशी

**थांबताच येत नाही**

हेमंत दिवटे

**शस्त्रे शमीवर आहेत तोवर**

मनोज पाठक

POETRYWALA

An english imprint of Abhidhanantar Prakashan

## VIRUS ALERT

**HEMANT DIVATE**

(Translated from Marathi by Dilip Chitre)

**Pages : 88** **Price Rs. 100/-**

## LIVE UPDATE

(An Anthology of Contemporary Marathi Poetry Translated & Edited by Sachin Ketkar)

**Pages : 176** **Price Rs. 225/-**

अभिधानंतर प्रकाशन

**हेमंत दिवटे**

संपादक

**‘अभिधानंतर’**

१७०१/१७०२, ६-ए व्हीस्परिंग पाम्स

लोखंडवाला टाऊनशिप, कांदिवली (पूर्व) मुंबई ४०० १०१

(०२२) ५६९२०३२०

poetrywala@hotmail.com

**‘अभिधानंतर’**

आता

**द्वैमासिक**

**वार्षिक वर्गणी - रुपये १५०/-**

**त्रैवार्षिक वर्गणी- रुपये ४००/-**

# वाईट कवितेविषयी थोडं

सचिन केतकर

चांगल्या कवितेची व्याख्या करणं जितकं अवघड आहे तितकंच 'वाईट' कवितेविषयी बोलणं सोपं आहे. त्याचं एक कारण हेही असेल की, वाईट कविता सगळीकडे भरपूर प्रमाणात सापडते. इतकंच काय, चांगली कविता वाईट कवितेच्या पार्श्वभूमीवर (background) वर ठळकपणे उभी राहू शकते. तर वाईट कवितेविषयी मला इथे थोडे मुद्दे मांडायचे आहेत.

१) 'चांगलं'-'वाईट' वगैरे संज्ञा मूल्यमापनाच्या 'evaluative' आणि normative' संज्ञा आहेत. मूल्य व मापदंड कधीही 'absolute' नसतात हे जरी खरं असलं तरीही मूल्यांकन हे अटळ व अपरिहार्य आहे. अगदी वर्णनात्मक (descriptive) व तटस्थ (nuetral) भूमिका घेतली तरी कुठली न कुठली मूल्यं (values, norms) गृहीत धरलेलीच असतात. म्हणूनच जरी मूल्य absolute व अंतिम नसली तरीही 'चांगलं' आणि 'वाईट'विषयीच 'working defination'-कामचलाऊ व्याख्या करण्याची गरज असते. असाच एक प्रयत्न मी इथे करतोय.

२) 'चांगली किंवा वाईट' कविता म्हणजे काय ह्याबद्दल विचार करण्याअगोदर कविता म्हणजे काय ह्याविषयी विचार झाला पाहिजे. ठरावीक गोष्टींविषयी ठरावीक प्रकारे केलेलं लेखन म्हणजे कविता, की मग वेगळ्या गोष्टींविषयी वेगळ्या प्रकारे केलेलं लेखन म्हणजे कविता हे आधी ठरवायला हवं. 'प्रेम', 'भावना', 'नाती', 'निसर्ग' वगैरे ठरावीक गोष्टींवर 'झाड', 'फूल', 'पाऊस' वगैरे ठोकळेबाज शिळ्या प्रतिमा वापरून आणि भावगीतसदृश 'मजला-तुजला'छाप कविता आपल्याला टनात मिळतात. असल्या कवितांचे 'Whole Sale' रद्दी उत्पादनांचे कारखाने आपल्याला गल्लोगल्ली सापडतात.

ह्या कारखान्यांमधून निर्माण होणारी कविता शालेय-महाविद्यालयीन अभ्यासक्रमांवर, वर्तमानपत्रं, दिवाळी अंक, दूरदर्शन मालिकांची रडगाणी वगैरे गोष्टींवर अवलंबून असते. पूर्वापार चालत आलेल्या साच्यांवर आधारलेली ही धोपटमार्गी कविता शिळी व रटाळ वाटणं सहाजिक आहे.

ज्याला आपण 'मुख्य प्रवाह' म्हणतो तो असल्या कवितेची प्रचंड मोठी गटार आहे. सर्वच मोठे 'प्रवाह' नदी नसतात. तर सगळीकडचा कचरा एकत्र येऊन तयार झालेला 'नाला'ही असू शकतो. मुख्य प्रवाह म्हणजे ठवावीक गावाकडे जाणारा मुख्य मार्ग आहे, ज्यावर हजारो तरुण 'अभ्यासक्रम' - 'दिवाळी अंक'-वर्तमानपत्र वगैरेंच्या वाहनांत बसून प्रवास सुरू करतात. ज्या दिवशी त्यांना समजतं की ज्या गावाकडे हा मार्ग जातोय ते आपलं गावही नाही आणि हा मार्गही आपला नाही त्या दिवशी एकतर ते कविता

लिहिणं बंदच करतात किंवा आपल्या गावाचा आणि मार्गाचा शोध घेतात, पण बऱ्याचदा असंही होतं की ह्या तरुणांची बौद्धिक कुवत कमी पडते आणि ठरावीक गावाच्या दिशेनी ठरावीक रस्त्यावर चालणं म्हणजेच आपल्या गावाकडे जाणं अशी समजूत टिकून राहते व आयुष्यभर कमालीच्या चिकाटीनं वाईट कविता ते लिहीत राहतात.

ज्याला आपण 'राजकीय' कविता वगैरे म्हणतो त्यातले धोकेही मुख्य प्रवाहातल्या धोक्यासारखेच असतात. म्हणजे, बऱ्याच वेळा नेहमीच्या ठरावीक अपराध्यांना (Usual suspects) ठरावीक शिव्या घालण्यापलिकडे तिची मजल जात नाही. शिव्यासुद्धा ठरावीक झाल्यावर त्याचा आघात संपतो आणि त्या 'शिव्या' उरतच नाहीत. उदाहरणार्थ, आई-बहिणींच्या नावांनी किंवा अवयव निर्देशक राष्ट्रीय शिव्या बऱ्याच वेळा लुटुपुटुच्या लढाईत किंवा खेळीमेळीतल्या वाग्युद्धात 'मीठ-मिरची' म्हणूनच उपयोगी ठरतात. खरा राग व्यक्त करायला ताज्या शिव्यांची गरज पडते. हे खरोखर रागावलेल्या इसमाला माहीत असतं. आणि प्रचलित शिव्या राग व्यक्त करायला किती निरुपयोगी आहेत हेही त्याला माहीत असतं.

मराठी कवितेत ठरावीक अपराधी म्हणजे सवर्ण, पुरुष, भांडवलदार, हिन्दुवादी, अमेरिकन लोक वगैरेंना शिव्या घालून किंवा त्यांच्याविरुद्ध भाषण दिल्यानं आपण 'राजकीय कविता' लिहीत असल्याचा बाळबोध समज भलताच प्रचलित आहे. त्याचा अर्थ असा नव्हे की, हे ठरावीक अपराधी अपराधी नाहीत. पण ह्याचा अर्थ भारतीय समाजाच्या समस्यांचा प्रचंड गुंता आणि गोंधळाचं बाळबोध सरळीकरण (Simplification) ह्या मंडळींच्या लेखनात सापडतं.

फॅशनच्या ओघात कवितेचं 'समकालीनीकरण'ही बऱ्याच वेळा केविलवाणं वाटतं. उगीच संगणक, मोबाईल, इंटरनेट वगैरे गोष्टींचा उल्लेख करून आपण 'नवीन' कविता लिहितोय हा भ्रमही लवकरच जायला हवा. त्याचबरोबर वर्तमानपत्र, टीव्ही चॅनल्स पाहून 'ब्रेकिंग न्यूज' किंवा 'हेडलाईन' कवितासुद्धा रटाळ होतात, कारण त्यात कवीला ह्या गोष्टीविषयी काही नवीन किंवा वेगळं सांगायचंही नसतं. आणि ह्या गोष्टींचा व्यापक संदर्भात विचार करण्याची क्षमताही कवीत नसते.

काही गोष्टींकडे ठरावीक पद्धतीनं पाहण्याच्या सवयीमुळे व ठरावीक प्रचलित पद्धतीनं विचार करण्याच्या सवयीमुळे कवितेत ठरावीकपणा, ठोकळेबाजपणा व सामान्यपणा येतो. आपली विचार करण्याची रीत, गोष्टींकडे पाहायची रीतच 'शंभरामधल्या नव्व्याण्णवां'सारखी असेल तर आपली कवितासुद्धा शंभरामधल्या नव्व्याण्णवांसारखी होते. आपली दृष्टीच नव्व्याण्णव टक्के लोकांसारखी असली तर आपली कविताही तशीच असणार. थोडक्यात, साच्यामधली कविता समाजात रूढ प्रचलित 'दृष्टी'च्या साच्यातून निर्माण होत असते.

वाईट कविता सपाट असते. प्रत्येक ओळीतून काही वेगळा अर्थ निघत नसतो. पण असं होतं, कारण कवीच्या दृष्टीलाच वेगवेगळे अर्थ सापडत नसतात. उदाहरणार्थ, माझ्या हातात चहाच्या टपरीवरून घेतलेल्या कटिंग चहाचा ग्लास आहे. पण ह्या ग्लासातून कित्येक वेगवेगळे अर्थ निघण्याची क्षमता आहे. ह्या ग्लासात फक्त चहाच नाही, मित्रांबरोबर मैत्री शेअर होत असते. त्याबरोबर वेगळ्या आठवणीही जुळलेल्या असू शकतात, ज्यामुळे मी हा कटिंग चहा घेतो आहे किंवा मला मोठ्या हॉटेलमध्ये चहा प्यायचा नाहीए किंवा मी चहाचा ॲडिक्ट आहे किंवा मला एकटेपणाचे काही क्षण पाहिजेत, किंवा मला एकटा पाडण्यात आला आहे, किंवा मी जगण्यातला रितेपणा भरण्यासाठीचा प्रयत्न करतोय किंवा टपरीवर चहा बनवणाऱ्या बाईवर माझं लक्ष आहे, वगैरे वगैरे. इतकंच काय, हा चहा फक्त चहा नाहीए. त्याला पुदिना, वेलची वगैरेंची चव आहे किंवा त्याला रॉकेलचा मंद वास येतोय. मी सकाळी, दुपारी, संध्याकाळी की रात्री चहा घेतोय. ह्यामुळे ह्या क्रियेला वेगळे अर्थ, संदर्भ लाभतात.

तर टपरीवरचा 'कटिंग चहा' मी घेतला ह्या क्रियेला कितीतरी पातळ्यांवर कितीतरी अर्थ प्राप्त होऊ शकतात. वाईट कवितेत ह्या अनेकपदरीपणाची जाणीव सापडत नाही, आणि ह्या दृष्टीतूनच चांगल्या कवितेच्या शक्यता जन्मतात. ह्या अनेक शक्यतांना कविता कशी काय उलगडून दाखवते हे कवीच्या दृष्टीवर आणि तंत्रावर अवलंबून आहे. ह्या गोष्टींच्या अभावातून वाईट कविता निर्माण होते.

वाईट कवितेची लक्षणं ज्या कवितेत सापडत नाहीत ती कविता चांगली म्हणायची का? चांगल्या कवितेची अशी नकारात्मक व्याख्या करता येईल काय? तर, त्याचं उत्तर 'नाही' असं द्यावं लागेल. वाईट कवितेची लक्षणं टाळून कविता सुघटत असते, पण 'चांगली' होण्यासाठी त्यापेक्षाही अधिक काहीतरी हवं. अशा एक दुर्मीळ, रासायनिक तत्त्वाचा शोध किंवा स्पर्श कवितेला झाला तरच ती खऱ्या अर्थानं चांगली होऊ शकते. भक्तिकवितेत ज्याला 'परतत्त्वाचा स्पर्श' म्हणून पाहिलं गेलं तो आध्यात्मिक दार्शनिक पातळीवरून. आपल्याला ह्या दार्शनिक बैठकीबद्दल संशय असला तरीही आपण एक गोष्ट कबूल करायला हवी की, 'चांगली कविता' अशा एका प्रदेशाकडे तोंड करते जो अपरिचित, रहस्यमय, शब्दातीत, विचारातीत असतो.

■

# मीनाक्षी राजेन्द्र पाटील यांना 'अभिधानंतर' पुरस्कार

चांगल्या कवितेचा शोध घेण्यासाठी 'अभिधानंतर' आयोजित अभिनव कवितालेखन स्पर्धेत 'इज इट इन योर डीएनए' या मीनाक्षी राजेन्द्र पाटील (मुंबई) यांच्या कवितेला दहा हजार रुपयांचा पुरस्कार मिळाला आहे. अन्य दहा उल्लेखनीय कवितांसाठी दहा कवींची प्रत्येकी एक हजार रुपयांच्या पुस्तकांच्या रूपाने देण्यात येणाऱ्या पुरस्कारांसाठी निवड करण्यात आली आहे. ही निवड पुढीलप्रमाणे :

गणेश वसईकर (विरार)

विजय वामनराव दळवी (अकोला)

अजित अभंग (कल्याण)

प्रा. पी. विठ्ठल (औरंगाबाद)

प्रा. डॉ. रवीन्द्र ठाकूर (कोल्हापूर)

हेमंतकुमार कांबळे (यवतमाळ)

मनिष अनसूरकर (थळ, अलिबाग)

किशोर मुगल (चंद्रपुर)

जितेन्द्र मिरकुटे (हिंगोली)

गोरक्ष जाधव (मंगळवेढा)

स्पर्धेचे परिक्षक म्हणून डॉ. सचिन केतकर, नितीन रिंढे, मोहन बोरसे आणि 'अभिधानंतर'चे संपादक हेमंत दिवटे यांनी काम पाहिले. पारितोषिक वितरण मुंबईत फेब्रुवारी महिन्यात केले जाणार आहे.

ही अभिधानंतरची अशा प्रकारची दुसरी कविता लेखन स्पर्धा आहे. या स्पर्धेमुळे महाराष्ट्रातल्या वरील नव्या कविंचा आम्हाला शोध लागला त्याचबरोबर स्पर्धेत सहभागी झालेले २६० नवे कवी आम्हाला वर्गणीदार म्हणूनही मिळाले. स्पर्धेत सहभागी झाल्याबद्दल सर्व कवींचे आम्ही आभारी आहोत. या अंकापासूनचे येत्या वर्षातील अभिधानंतरचे सहा अंक तुमच्या कवितेच्या प्रवासाला सहाय्य देणारे ठरतील असा आम्हाला विश्वास वाटतो. या स्पर्धेत उल्लेखनिय ठरलेल्या ११ कवितांपैकी २ दीर्घ कविता या अंकात प्रसिद्ध करीत आहोत. पहिला पुरस्कार मिळालेली मिनाक्षी पाटील यांची 'इज इट एन योर डीएनए' ही कविता सर्व परीक्षकांना जशी महत्त्वाची वाटली तशीच गणेश वसईकरांची '१० मिन्टांची कविता' ही कविताही परीक्षकांना महत्त्वाची वाटली. अन्य उल्लेखनिय कविता अभिधानंतरच्या मार्च-एप्रिलच्या अंकात प्रसिद्ध करण्यात येतील.

- संपादक

# इज इट इन योर डीएनए?

## मिनाक्षी राजेंद्र पाटील

फ्रस्ट्रेशनने दिवस भरलेले असताना
मोकळं व्हावसं वाटत असूनही
मोकळं होता येत नाही
अन् सुरू होते एक निरर्थक वणवण
मुलाधारापासून थेट सहस्रापर्यंत
व्हाया चर्चगेट
फिरून आल्यावर
पोटातला खड्डा पेटत जातो
सहस्ररश्मीसारखा
अन् धगधगत घशापर्यंत येतो
ॲसिडीटीचा जळजळीत लाव्हा
सुषुम्नेसारखा.
असं दिशाहीन भटकताना
ओलांडता येत नाही काळ
रेल्वे रूळासारखा
आणि दिसू लागतं सारं शहर
एका प्रदीर्घ जांभईसारखं.
वडापावच्या गाडीवर
कितीतरी वेळ
पैसे धरून उभं राहिल्यावर
गाडीवाल्याचं आपल्याकडे
लक्षही जाऊ नये
इतकं भिकार वाटत असतानाही
दिसतो
महात्माजींचा तेलकट चेहरा
कुणीतरी वडा खाल्लेल्या कागदावरचा.
जाऊ दे!
महात्माजी झाले म्हणून काय झालं?
त्यांनाही भूक लागतच असेल.
सालं, ही भूक भलती डेंजरस
पोटाची अन् अजून कसलीकसली
तिच्यावरच मार्क्स जगलाय,
फ्रॉईड पोसलाय,
संतांपासून महात्म्यांपर्यंत
सगळ्यांचा काळ सोकावलाय
काही काळ तगण्यासाठी
आतली फेकून भाजी नासकी
खाऊया कव्हर वड्याचं
तसंच झालंय
सगळ्या सीस्टिमचं.
फ्रस्ट्रेशनच्या नावानं अंघोळ करून
प्यायला पाणी नाही म्हणून
सरळ गाठून
मुंबई सेंट्रल आर बी आय क्वार्टर्स
ताईला अलॉट झालेल्या
पण राहायला न गेलेल्या
क्वार्टरच्या चाव्या
अभ्यासासाठी म्हणून ठेवलेल्या
फारच उपयोगाच्या
अशा बोरकर पीरियडमध्ये.
शेजाऱ्यांकडून मागून
भांडंभर पाणी
रिचवून गळ्याखाली
ताणून देताना, सोबत करते
फॅनची घरघर
जगाच्या दृष्टीनं अस्तित्वच संपलेलं
काही क्षण-तासांसाठी.
चार तासांनी उठल्यावर
लावून कडीकुलूप
मनातल्या नश्वर विचारांना

गाठायचं स्टेशन
बसायचं
कुठच्याही ट्रेनची वाट न पाहता.
सगळं स्टेशन बघून
कंटाळा आला
की फिरून यायचं
ट्रेननं उलटं सुलटं.
मग शेवटी चुकल्या फकिराप्रमाणे
रूपारेल गर्ल्स कॉमनरूम सेकंड गाठून
कॉर्नर बाक खिडकीजवळ
व्हायचं समाधिमग्न.
हळुहळू ओसरणारी गर्दी
अन् भिंतीवर चिपकलेली पाल
पाहता पाहता

तिला द्यायच्या सूचना
'उजवीकडून हळू चाल
मग डावीकडे वळ'
चुकून आज्ञापालन करणारी पाल
पाहून हसणाऱ्या चारचौघी
हळुहळू जवळ आल्यावर
भंगून तंद्री
बघावं आजुबाजूला तर दिसते
कोपऱ्यात कधीचीच रडत बसलेली 'ती'
आता तिला समजावलंच पाहिजे
की तो तिच्या लायकीचाच नव्हता म्हणून
पहिल्यापेक्षा बरा होता म्हणून काय झालं?
इतकं वर्चस्व गाजवणंपण बरं नाही
पण आता मात्र जो येणार आहे
तो खरा स्वप्नीचा राजकुमार असेल.
पोरगी हादरली, तुला एवढं कसं कळतं?
म्हणून मोठ्ठाले डोळे अधिक मोठ्ठाले करू लागली
जीवात जीव व डोळ्यांत स्वप्नं घेऊन
पोरगी पसार झाली.
भिंतीवरची पाल आज्ञाधारकपणे होती तिथेच.
पोरी व पालींचा कंटाळा आल्यावर
पाण्याच्या टाकीवर
मारून पाण्याचे फवारे
हुंगून घेतला मातीचा वास
बेंबीच्या देठापर्यंत
पालीसारखं संध्याकाळ ऐकत नाही
यायची थांबत नाही,
की थोडीशी लांबत नाही.
परतीचे दोर कापल्यावर
पुन्हा
मुक्काम पोस्ट पेईंग गेस्टरूमवर.
संध्याकाळचा डबा घ्यायला
पोचावं तर
जिन्यापासून साथ देणारी
डब्याच्या आसपास
जोरजोरात उड्या मारणारी
उंदरं पाहून
पोटातले कावळे चिडीचूप.
उगाच सगळ्या अन्नाला
लागलेला उंदरांचा वास
ढवळून काढतो सगळं जगणं.
नाइलाज को क्या इलाज?
म्हणून पाहायची वाट
रात्रभर
इतरांच्या अरुणोदयाची
रात्रभर धावत राहायचं
स्वप्नात
कुठूनतरी कुठेतरी
अन् थकूनभागून
हांपता हांपता
सुटकेचा नि:श्वास टाकत
जागं व्हायचं
कामवालीच्या गदागदा हलवण्यानं.
मुखप्रक्षालनानंतर प्यायचा
पावडरीच्या दुधाचा कुबट चहा
अन् बसायचं लोकलमध्ये
सूर्याला शेकत.
ओघळलेल्या गालांवर
लावलेली रूज अन्
थापलेल्या लिपस्टिकवर
आठ स्टेशनांत अठ्ठावीस वेळा
लिपस्टिक थापणारी बाई पाहून
का आठवत राहतात
आरसेच आरसे
'मुगले आझम'मधले?
कोपऱ्यात गालातल्या गालात
स्वत:शीच एकदा नव्हे
तर वारंवार
हसणारी मुलगी
सारखी ओढणी करते ठाकठीक.
एकमेकांशी वचावचा भांडणाऱ्या
दोन कोळणी अन् टोपल्यांतल्या
निष्प्राण मासळ्या.
सर्व बायका अन् निष्प्राण मासळ्या
व्यापतात लोकलचा सर्व डबा.
प्रत्येक स्टेशनातले वेगवेगळे वास
भेदून टाकतात रंध्र न् रंध्र
अन् प्लॅटफॉर्मवर उतरता उतरता
समोरचीच्या केसांतल्या गजऱ्यातून
मोगऱ्याचं फूल तोडायचा
केल्यावर प्रयत्न
तिनं दिलेला खुन्नस

अन् हातात आलेल्या
पाकळ्या पाहताना
उगाच गुणगुणायला होतं
'मोगरा फुलला...... मोगरा फुलला......'
स्टेशनपासून
हातातल्या पाकळ्या हुंगत हुंगत
वर्गापर्यंत पोचताना
वाटेत भेटतात सुरकतलेले शिपाईमामा
अन् लक्षात येतं,
तांबड्या पडलेल्या
पाकळ्यांचं काय करायचं?
सायको लॅबच्या शेजारच्या गुच्छेदार फुलांच्या
गुच्छांवर कोंबून त्यांना
नस्त्या समाधानानं
वर्गात शिरायचं अन्

सक्काळी सक्काळी पहिल्या तासाला
शिकवायला घ्यायचे नारायण सुर्वे
'...... ना घर होतं, ना गणगोत
चालेन तेवढी पायाखालची जमीन होती.....'
अजून किती तुडवायची जमीन
कुणास ठाऊक?
उगाच आठवत राहते
टॉलस्टॉयची गोष्ट
'माणसास मरताना किती जमीन लागते,
किती भूखंड लागतो...?'
छे! छे! भूखंड नव्हे जमीनच.
जमिनीला भूखंड म्हटलं
की सगळीच परिमाणं बदलतात.
या महानगरात
इंच इंच जमिनीसाठी
खंडीभर माणसं निरंतर झुंजतात.
त्यात आपण कशाला करायची भाऊ गर्दी?
भाई गर्दी?..... की बाई गर्दी?
सालं, आपल्यासाठी
मायने राखत नसलं
तरी खंडीभरांसाठी महत्त्वाचं असलेलं
हे लेबल
कितीही म्हटलं तरी तुटत नाही.
'बाईची जात'
सूटबूट घातले तरी सुटत नाही
तर ऐकुया एक कहाणी.....

'आटपाट नगरात राहायच्या
कॉलेजातल्या दोन बाई
एक शिकवायची ज्ञानेश्वरी
दुसरी शिकवे कविता विद्रोही
ज्ञानेश्वरी ऐकताना
मिळे प्रवचनाचा आनंद
विद्रोही शिकताना
करी रक्त बंड
त्या दोघी, त्या दोन ध्रुवांवर
अन् आम्ही फसलो
बीच भवंडर
अन् अचानक
विद्रोहीशी नाळ जुळली
कधी मनाच्या गाभ्यात शिरली
अशी मन व्यापलेली बाई,
प्रत्येक बाबतीत
संदर्भग्रंथ कोळून पिणारी बाई,
कुणाचंतरी ऐकून
फारच रागावली.
येणाऱ्या जाणाऱ्याजवळ
आमच्या असलेल्या-नसलेल्या
लायकीचा हिशोब करू लागली
अन् रातोरात
कधी नव्हे ती
विद्यार्थिनीची प्रसिद्धी वाढली
काय घडतं असं दोन माणसांत,
अगदी अचानक
एकमेकांचा इतका तिरस्कार
वाटावा एवढं?
खरं तर, आपल्याला नॉर्मल बोलता
येत असताना
माणसं का नाही राहत उभं
समोरासमोर
अन् विचारत नाहीत
जाब एकमेकांना
का करतात उभ्या भिंती
किंवा
फुगवून सोडत राहतात
आपल्याच कल्पनेचे फुगे
लोकांसमोर?
लोकांना माहीत नसलेलं

जे खरं आहे की खोटं
याची केलेली नसताना शहानिशा
का ओकत राहतात अपचनासारखं.
की असतात ती नाती
अतिपरिचयात अपचनासारखी?
बट स्टिल..........
बाई अजूनही भलतीच आवडते
तिनं कितीही तिरस्कार केला तरी
ती न आवडण्याची अजून
कुठलीच कारणं
सापडली नाहीत मला
म्हणूनच,
बाई अजूनही भलतीच आवडते!
तिच्यासाठी आजही सगळ्यांशी वाद होऊन
बाईचं श्रेष्ठत्व पटविण्यात
वेगळीच मजा येते.
का कुणास ठाऊक?
कसलंतरी ऋण असावं
या जन्मी + गेल्या जन्मीचं
(बाई नक्कीच भडकणार......
'गेला जन्म' म्हणणारी माझी विद्यार्थिनी
म्हणून घ्यायच्या लायकीचीच नाही
म्हणून एक
भारदस्त लेक्चर देणार.)
म्हणूनच तिच्या शिव्यांचंपण
काही वाटत नाही
सतत नांदत असते
मनात आदिमायेसारखी!
आदिमाया........ आदिशक्ती..........,
एक आदिबंध.
खरोखरच, बाई असणं असतं का इतकं गुंतागुंतीचं?
की हीपण असते एक मिथ!
शरीरावरचे खाचखळगे अन् उंचवटे
सोडले तर मन नामक गोष्ट
तशी बाई-बाप्यात असते युनिवर्सल.
मग याच गोष्टींचा करून बाऊ
उभारल्या जातात
भल्यामोठ्या बाजारपेठा
अन् विकली जातात
उत्पादनं म्हणून बाई अन् बापेच!
अस्तित्वाच्या या लढाईत
बाईनं का म्हणून मागं राहायचं
स्वातंत्र्याचा मिनीस्कर्ट
अन् अस्मितेची चोळी घालून
रेड कार्पेटवरून मिरवायचं.
कॅटवॉक करणारी बाई,
खडी फोडणारी बाई,
देश चालवणारी बाई,
मनानं कधीच राहत नाही मागे.
खरं तर,
निर्णयाचं स्वातंत्र्य नाही म्हणून
नशिबाला दोष देत नाही बाई
मनातल्या मनात ठरलेले असतात
तिचे चॉईस
कधी हसून, कधी रडून तर
कधी झगडून मिळवून घेताना दिसते
ती सॅटिसफॅक्शन.
बाईला 'वस्तू-साधन' समजणारा पुरुष
स्वत:च कधीच झालाय वस्तू
हेच कळू द्यायचं नाही त्याला
हाच मोठा आंतरराष्ट्रीय कट
समजू द्यायचा नाही पिढ्यान्‌पिढ्या
या विचारात असते बाई दंग
कारण नकाराचं सामर्थ्य
तिनं दाखवून दिलंय वळणावळणावर
अन् तरीही........
अन् तरीही........
हीच असेल का बाई असण्याची गुंतागुंत?
बाईची आगळी-वेगळी वर्णनं
करणारा पुरुष,
बाईच्या मुखानं बोलणारा
पुरुष
भेटत राहतो ललित कलांमधून
अन् तरीही म्हणे
तिची मोहिनी उरतेच दशांगुळे.
बाई असण्याच्या,
बाईच्या शोषणाच्या
कहाण्या लिहिल्या बाईनं
त्यापण झाल्या फारच प्रसिद्ध
फारच उघडंवाघडं लिहिलं
अन् तेही बाईनं
की फारच नशीब उघडतं

रातोरात बंडखोरी
अन् प्रसिद्धीचं बिरूद चिकटतं
बंडखोरी
कुणाची? कुणाविरूद्ध? कशासाठी? का?
जाऊ दे बाई,
बायका बायकांचं बघतील
पुरुष पुरुषांचं बघतील
नाहीतर व्हाइसव्हर्सा
एकमेकांचं बघतील!
सगळं काही बघून
तसंच
सगळं काही अगोदरच सांगून झालंय
व्यासोच्छिष्टं की उष्टम्
म्हणतात ना ते तसं
मग नवीन काय सांगायचं?
खरं तर कशावरही स्टेटमेन्ट करणंच
वाटतंय निरर्थक
बाई काय अन् बुवा काय
कुणाशीच स्वत:ला रिलेट करता येऊ नये
अशा निर्वात कालखंडात
सेकंदा सेकंदाला धडकतात बातम्या
बॉम्बस्फोट
दरोडे
खून
मारामाऱ्या
जाळपोळ
गोळीबार
बलात्कार
व्यभिचार
भरीत भर
भूकंप
वादळवारा
त्सुनामी
माणूस लाचार

माणसाचा माणसाला डंख
माणसाचा निसर्गाला डंख
अन्
निसर्गाचा माणसाला जोरदार डंख
निसर्गाला वाकवू पाहताना
माणूस मोजतोय नफातोटा
हल्ली झालाय माणूस छोटा
अन् पैसा मोठा.
पण त्या दिवशी अनुभवलं -
'पैसा झाला खोटा
पाऊस आला मोठा
ये गं ये गं सरी
माझं मडकं भरी.
सर खरंच आली धावून
मडकं गेलं वाहून'
या घटातलं अवकाश
त्या अवकाशात सामावलं
मिठीचं पाणी न्यूऑर्लिन्सला पोचलं
ऑटोमॅटिक गाड्यात
मृत्यूनं ऑटोमॅटिक कवटाळलं.
यंत्रापेक्षा, माणसांपेक्षा
निसर्ग मोठा झाला
घरा-माणसांबरोबर त्यांचा
अहंकार वाहून नेला.
अन् म्हणे.........,
जगाला जवळ आणतंय नेट
दूरदेशीचा घरात भेटतोय थेट
अन् तरीही
माणसांचं झालंय बेट.
जो तो बनवतोय तत्त्वज्ञान
प्रत्येक गोष्टीचं
गाजरगवत पिकतंय
गल्लोगल्लीच्या विचारवंतांचं
'हमखास यशाचा मार्ग
मित्र मिळवा जग जिंका
उत्तम व्यक्तिमत्त्वाची बारा गुपितं
....................
....................'

प्रत्येक गोष्टीत यशाची खात्री देणारा
मात्र देऊ शकत नाही खात्री
स्वत:च्या यशाची!
लिहिणारे लिहिताय,
छापणारे छापताय
अन् वाचणारे वाचताय
घातले जातायत मागणी तसे रतीब.
जो तो आपल्याच कोषात

आपल्याच मातीत
लोळतोय आपल्याच मस्तीत.
सालं, कुठलीही माही ही मातीसारखीच
अन् वेगवेगळं असलं म्हणून काय झालं?
प्रत्येकाच्या आयुष्याचं मातेरं हे
मातेऱ्यासारखंच!
इतिहास वेगळा असला
म्हणून काय झालं?
भूगोल तर एकच आहे.
फिरून त्याच वळणावर
भेट आपली अटळ आहे.
अशा या गोंधळभारल्या हवेत
शिकवून मुलांना सुर्वे
निघायचं पुन्हा शब्द किसायला
मुकेपणानं शब्दांच्या कोषात
स्वत:ला हरवायला.
वाचून वाचून अनंत पुस्तकं
निवडायचे शब्द दुसऱ्यांच्या मनातले.
मानेला येणारी कळ
गाठून ग्लासचा तळ
ढवळून काढते मनाला
अन् उमटत राहतात कागदावर
उभ्या-आडव्या रेषांचे ताणे-बाणे.
काढताना वर्तुळात वर्तुळ
वर्तुळात असंख्य वर्तुळं
अन् वर्तुळाला छेद देणाऱ्या
उभ्या-आडव्या असंख्य रेषा
त्यातून उमटते लहानपणची
एकुलती चांदणी क्षितिजावरची.
हळुहळू मानेतल्या कळा
वाढत जातात प्रचंड
अन् वाढत जातो
टाईपरायटरचा आवाज
टकटक..... टकटक.....
कटकट..... टकटक
कंटाळून आवाजाला
पाय न वाजवता
बसून सूर्याच्या सावलीत
किसावेत शब्द
तर
क्रॉसबीच्या पाठलगाने
उन्हावलेला सूर्य
स्वत:च शोधत असतो सावली.
हळुहळू चटके वाढू लागतात
वाचताना क्रॉसबीचं सूर्यमरण
अन् मोजताना मरणाचे डोळे
वितळू लागतो
सावली शोधणारा सूर्य.
दिवसभर किसलेल्या शब्दांना
पापणीतलं मीठ लावून
बरणीत भरल्यावर
संध्याकाळी उतरताना पायऱ्या
फुटपाथवर फडफडणारा गुरुदत्त
बघत असतो केविलवाणं.
वाचता वाचता हरवलेलं
दिवसभराचं जग
जागं होतं सर्व दिशांनी
ओसंडून जाते संध्याकाळ
सर्व प्लॅटफॉर्म्सवर.
कुठल्यातरी स्काय-फाय पिक्चरमधल्यासारखे
अनोळखी ग्रहावरचे
धावताना दिसतात इकडे तिकडे.
हरवलेल्या गर्दीत हरवून स्वत:ला
ढकलून लोकलच्या घशात
आपल्या स्टेशनात
आपोआप फेकलं गेल्यावर
गोळा करायचे सर्व अवयव
थिजलेल्या मनासकट.
किसून किसून शब्द न् शब्द
बोलून बोलून शब्द न् शब्द
वाटतं जावं अज्ञात मौनात
पण कसलं काय!
तोंड बोललं नाही
तरी
थांबत नाही मनाची बडबड
काहीही ऐकायची,
काहीही बोलायची
इच्छा नसतानाही
सुस्त अजगरासारखं
पडून राहावंसं वाटत असतानाही,
आजुबाजूला अखंड आवाज
येतच राहतात

कर्णपिशाच्च बोलल्यासारखे.
माणसं स्वत:ला अडकवत राहतात
कुठे ना कुठे
बसच्या दांड्याला, खांद्यावरच्या पिशवीला,
ऑफिसमधल्या खुर्ची-टेबलाला,
टेबलावरच्या फायलीला,
फायलीमधल्या विषयाला
पण विषयातल्या माणसांमध्ये
अडकवून घेत नाहीत माणसं स्वत:ला!
माणसं बघतात एकमेकांना
कोऱ्या भिंतीकडे बघितल्यासारखं
नाहीतर बघतात थेट भिंतींच्या आतलं!
माणसं वाळवीसारखं पोखरत राहतात
एकमेकांना, संपूर्ण व्यवस्थेला
थोडासा चोथाही न ऊरू देता!
अशा चोथा झालेल्या
मनात येत राहतं-
करायला नको होता कंटाळा
शब्द किसायचा
करायला नको होता कंटाळा
बोल बोल बोलायचा
उगाच केली हौस
ध्रुवबाळाच्या आसनाची
कल्पना होती कुठे तेव्हा?
पुढच्या घुसमटीची
जरी होती क्लॉक अवरची
टांगती तलवार
तरी जिवंत होती कविता
अन् मनाला होती धार.
आता मात्र सभोवताली-
फायलींचा पसारा
फोनचा गजर
माणसांची वर्दळ
फॅनची घरघर
उघड्या खिडकीतून
आकाशाचा तुकडा
तेवढाच दिलासा
एकच फुंकर.
प्रत्येक फायलीशी
खरं तर जोडलेला असतो एक माणूस
पण इथे घेतली जाते मात्र नोंद त्याची-
'सुब्रमण्यम द.दा. केला का?
सामंतांचा निलंबनभत्ता गेला का?
श्रीवास्तव इश्यू झाला का?'
निर्विकारपणे होत असतात
इथे लोक सस्पेन्ड
तर कधी सामावले जात असतात
परत सेवेत.
कधी होत असतो कुणाचा
प्रतीक्षाधीन कालावधी नियमित.
सालं, कधी संपेल एकदाची
ही अनामिक प्रतीक्षा
साठत चाललीय आतआत
एक अतर्क्य अस्वस्थता
कुणीतरी सारखं ठोकतंय
सतत धडका देतंय
भयंकर आदळतंय
बेभान आपटतंय
..........................
झोपेत, जागेपणी
दरक्षणी खदखदतंय
आतआत ठसठसतंय
कुठून आलं? का आलं?
काय आहे? काही कळत नाही.....,
सारं शरीर-मन पोखरतंय
..........................
अन् येणारा तो एक अपरिहार्य क्षण......
उधळणाऱ्या रंगांनी
सगळा कॅनव्हास व्यापल्यावर
भिंतीचा कोपरा न् कोपरा
रंगवल्यावर
बोलू लागतात सगळे रंग
दिसू लागतात
हिरव्या हिरव्या गालिच्यावर
बसलेले
वनवासच्या मुखपृष्ठावरचे बालकवी
तळ्यातल्या चांदण्यांत हरवलेले गाडगीळ
अन् अथांग सागरात निघालेला हेंमिग्वे
माशाच्या शोधात.....
स्वत:शीच कितीतरी वेळ बोलणारी
सिल्विया पाथ अचानक
निघून जाताना दिसते

व्हर्जिनिआच्या शोधात.
सगळी साली भंकस इत्यादी वगैरे म्हणत
नेमाडे बसतात कोसला विणत
हॅटवरची मेणबत्ती पेटवून
हसतो व्हॅनगॉग
डोळे मिचकावून
म्हणतो, काढ चित्रं
झालं गेलं विसरून.
कपाटातली सर्व पुस्तकं, सर्व ब्रश
अन् कोपऱ्यातली वीणा
घालू लागतात फेर माझ्याभवती
मीपण आठवू लागते गाणी
स्पष्ट दिसू लागतात साऱ्या गोष्टी
दूरून ऐकू येत असतात
नादावणारे स्वर
मीपण लिहीत जाते झरझर
माझीच गाणी
माझ्याच गोष्टी
मीच रंगवते
माझी चित्रं
आकाशातली नक्षत्रं.
मी वाचून काढते
मानसशास्त्र, समाजशास्त्र, तर्कशास्त्र.....,
समजून घेऊ लागते
सर्व शास्त्रांचे अर्थ
मी शोधू लागते नातं
विज्ञान आणि अध्यात्माचं
नातं माणसामाणसाचं
नातं माणूस अन् किडामुंगीचं
नातं माणूस अन् विश्वाचं
शोधण्यातला आनंद कळावा इतरांना
म्हणून म्हटलं सारे शोधुया एकत्र
म्हणुया गाणी, रंगवुया चित्रं
शास्त्र म्हणतं-
‘कार्यकारणभाव असतो म्हणे प्रत्येक घटनेमागे’
गाणी म्हटली, चित्रं काढली
अन् लगेच बदली झाली.
मी तर सदैव शोधली
माणसं फायलींमधली
अन् तरीही झाली बदली.
चला समजून घेऊ या
बदल हा सृष्टीचा आहे नियम
सर्व सतत बदलतं हे मात्र कायम.
नव्या ठिकाणी नव्या फायलींमधली
ऐकायचीय माणसांची धडधड
जागं ठेवायचंय संवेदनांना
ऐकायचीय मनाची बडबड.
ठाम खात्री आहे एका गोष्टीची
खुर्ची बदलल्याने फक्त
बदलणार खुर्चीच!
मग बसणाऱ्याने बदलवलं स्वत:ला
तर ओळख हरवणार स्वत:चीच!
ठरवायचं असतं ज्याने त्याने-
स्वत:ला हरवून
आपण खुर्ची व्हायचं का?
चार दिवसांच्या खुर्चीसाठी
आतल्या माणसाला मारायचं का?
बदलतात खुर्च्या, बसायच्या जागा
म्हणून ‘आतल्या जागल्या’ला हाकलायचं का?
लक्षात ठेवायला हवं ज्याने त्याने
‘खुर्ची’ - खरं तर बसायची जागा
पण बऱ्याचदा बसते आपल्या चेहेऱ्यावर
मग हळुहळू माणसांतून उठतात माणसं
अन् हलकेच एक दिवस
देते तुरी खुर्ची
तेव्हा माणसांतून उठलेल्यांना
ना असते जागा
माणसांत ना मसणात!
अन् तरीही माणसं बदलत नाहीत.
स्वत:च्या पुढच्या क्षणांचा नसताना भरवसा
बदलवू पाहतात दुसऱ्याचं जगणं
खरं तर बरंच हरवतात स्वत:तलं
त्या नश्वर वजाबाकीतून!
संध्याकाळी परतताना ऑफिसमधून
बिनचेहेऱ्याच्या गर्दीतून
वाहत जाताना दिसतात सारे
एका अनामिक गंतव्याकडे
अन् खिजवून पुन्हा पुन:
विचारत असतं नाक्यानाक्यावर
प्रत्येक होर्डिंग
**इज इट इन योर डीएनए?**

■

# १० मिन्टांची कविता

## गणेश आत्माराम वसईकर

मित्रानं
माहीमच्या उरुसात मला
उभं केलं होतं आरशासमोर
माझ्या वयाला साजेसाच
मी टरारून गेलो होतो
टरारून जाणारा नाही तर काय?
माझं पोट हे सुटलेलं
डोळे खोबणीतून बाहेर डोकावलेले
हात आखूड
आणि सर्व वस्तूंना स्पर्श करायला
नाक पुढे झालेलं
ओठ ओठापासून विलग
जसं दुकानाचं उघडं शटर
आणि दात दिसत होते
सिमेंटच्या पोत्यांसारखे
रांग धरून
टरारून जाण्यासारखं होतंच काय?
सर्व तर खोटंच होतं
तरीही पळून मी
आरशाला ओलांडून आलो बाहेर
सत्य आजवर असंच
धूम पळत वाचवत आलंय स्वत:ला
खोट्यांच्या घेरावातून
बडबडत
मला हे सहन होत नाही
मला हे सहन होत नाही
कुणीही समजून घेत नाही
मीही आता हेच म्हणालो
खोटे आहेत हे आरोप

माझ्या सर्वांगावर
विलक्षण थरथरीची हुकमत
चेहरा घामानं डबडबलेला
माझ्या आवाजात कापरं शिरलंय
कोण समजून घेईल
माझी थरथर?
माझा कंपित आवाज?
कसोशीनं पाळत आलोय मी
कामाच्या वेळा
मला पसंत नव्हतीच कधी
कामातली टंगळमंगळ
मी कलीगची विचारपूस जरूर केलीय
हे काय दुसऱ्याच्या डोळ्यांतलं
मुसळ शोधणं नाही
कमी कर रे तुझं पिणं
आता तू अकेला पंछी नाहीस
तुलाच तर सांभाळायचाय
कुटुंबाचा डोलारा
त्यात, तुझ्या बायकोला जॉब नाही
कामाच्या पलिकडे असतो ना माणूस
हाडामांसाचा, श्वासाची देवघेव करणारा
अजून भावनांचे आविष्कार
पॅकेजमधून उपलब्ध झाले नाहीयेत मार्केटमध्ये
कुणाला आहे फुरसत
गप्पांना टोकं आणेपर्यंत बोलायची?
जगण्याला न्याय देतो श्वास
तोच दुवा माझा आणि कामाचा
मी परावर्तित करत आलोय
माझ्या कामाला पगाराच्या रकमेत
कारण मला कळलेलं आहे हातांचं महत्त्व
ज्यांना भुकेचा अर्थ पुरेपूर समजतो
मला खूप कष्ट पडलेयत
भुकेचा अर्थ समजून घेताना
तिचे शब्द, तिचा उच्चार
कल्पनेपलिकडचा तिचा संदर्भ
तिची अपरिहार्यता
पोखरून टाकते कणा
गारुडीच्या पुंगीसारखी डोलायला भाग पाडते
आत्म्याचा गाभा
प्रत्येक ऋतूत तिची वेगळी अदा
ही टीव्हीची चॅनल्स नाहीत
ठरावीक वेळेत बातम्या सगळ्या चॅनल्सवर
ठरावीक वेळेत ॲड्स सगळ्या चॅनल्सवर

एका कार्यक्रमात सासू घराबाहेर पडते
दुसऱ्या मिन्टाला
दुसऱ्या चॅनलवर सून दरवाजा लावून घेते
आणि तरीही
भुकेचा अंतिम अर्थ
मला कळत नाहीय
की मी हवा तसा तो बदलू शकेन?
मी बाळगून नाहीये तेवढी कपॅसिटी
मी इकडची खुर्ची तिकडे करू शकत नाही
टेबल जरासं पुढे केलं
तर का? का? म्हणून विचारणा होईल
ऑफिसच्याच कामासाठीचं पेन
इन्डेन्ट केल्यावरच मला मिळतं
माझ्या इन्शुरन्स पॉलिसीचा रेकॉर्ड
बघायचा झाल्यावर
माझ्याकडे केली जाते डमी कार्डची मागणी
मी माझ्या परफॉर्मन्सविषयी काय बोलू?
मी केलेलं आहे माझं मूल्यांकन
पण त्याला मान्यता मिळेल?
ती दूर ठेवलेली माझ्यापासून
कॉन्फिडेन्शिअल आणि सीक्रेटच्या कैदखान्यात

मी नाटक पाहिलंय
जे घडतं रंगमंचावर
मी मिळवला नाहीये प्रवेश
पडदा सारून मेकअपरूममध्ये
विंगेतला प्रेक्षक हीच माझी पहिली
आणि अंतिम भूमिका
रंगमंचावर घडणाऱ्या सत्यावर तेवढाच
विश्वास ठेवणारी
मी मुळातून वाचली नाहीये संहिता
म्हणून मधल्या बदलाला
मी अनोळखी
जसा रंगमंचावरचा नट
विंगेतल्या प्रेक्षकांना

प्रश्न प्रतिष्ठेचा झाला की
उत्तरं जवळ यायला बिचकतात
आणि मग
१० मिन्टांचं कन्सेशन
९ वर्षांच्या सर्व्हिसलाही भोवतं

जे भाग्यवान असतात
उनकी बात छोड दो
१० मिन्टं आधी ऑफिस सोडून
गाडी पकडण्याचंही त्यांचं भाग्य असतं
आणि
माझ्यासारख्या करंट्याच्या पायांत
जबाबदारीची साखळी अडकवून
वाजवली जाते वारंवार
माझ्या लंचटाइममधल्या १० मिन्टांच्या
भरपाईला मिळतो नकार
आणि उभा राहतो यक्षप्रश्न
१० मिन्टांच्या मूल्यांकनाचा
कोण माझं काम कन्ट्रोल करणार?
कोण सुपरवाइज करणार?
आणि उघड्या डोळ्यांना
एवढंच बघायचं शिल्लक राहतं की
जाणारे जातात मोकळ्या पायांनी
आणि साखळीचा आवाज मोठा होत जातो

कामाच्या मूल्यांकनाची पद्धत
माहीत करून घ्यायचो मी
एकदा प्रयत्न केला तर
बदल्यात मला मिळाली धमकी
१० मिन्टं मी बेसिक पगारातून गायब
१० मिन्टं मी ऑफिसच्या परिप्रेक्ष्यातून डच्चू
ह्या १० मिन्टांनीच मला बसवलं
आरोपींच्या पिंजऱ्यात
ही १० मिन्टं वाचवणार होती
माझ्या प्रवासातले जास्तीचे २ तास
आणि तरीही मला नेहमी
नकारघंटा ऐकवण्यात येत होती
मलाच नेहमी
नकारघंटा ऐकवण्यात येत होती

हा आवाज असाच होत राहिला
तर फुटतील दोन्ही कान
आणि ॲलिगेशन लेटरने
तर उरलासुरला संयम काढला मोडीत

मी पिनबॉक्स आदळला माझ्या टेबलावर
विखुरल्या पिना जिकडे तिकडे

वाटलं, सगळ्या उंच उडून
माझ्या मेंदूत रुतून मोडतील
मुठी आदळल्या धाडधाड टेबलावर
खैर नव्हती थरथरत्या टेबलाची
आणखी कुणाकुणाची?
मला न्याय हवा होता, न्याय
कोणत्याही परिस्थितीत
आत्ताच्या आत्ता
या मिन्टाला
या सेकंदाला
कुठे चुकले माझे?
डिपार्टमेंटमधल्या बदलाला माझा
कधीच नव्हता नकार
नव्हताच कोणत्या कामाला
मग पाल कुठे मुतली?
परफॉर्मन्स समाधानकारक नव्हता
तर ओरली समज द्यायची
ते धरून होतं न्यायाला
परंपरावादी प्रोसीजरला
माझा आवाज मोठा होतोय
याचा शोध इसवी सन शके
कोणत्या दिवशी लागला?
भीतीशी गाठ पडली माझी कोणत्या दिवशी?
सतत संपर्कात आल्यावर
भीतीही पुरवते शक्ती
आणि मेलेलं कोंबडं
आगीला भीत नाही
आता हे टेबल फुटणार
ही खुर्ची जाऊन फुटेल कोणाच्यातरी डोक्यात
मी उभा होतो तिथं नव्हती जमीन
मला दिसत होती फक्त रिक्तता
ऑफिसातले कर्मचारी एकाएकी अदृश्य झाले,
की सुरक्षेच्या कारणासाठी त्यांना
घरी पाठवण्यात आले?
की तल्लीन झाली होती बघ्यांची गर्दी
कुणाला टाळ्या वाजवणं सुचलं नाही
एकही शिट्टी आली नाही गर्दीतून
हसलं नाही कुणी
रडलं नाही कुणी
फक्त एकजण टॉयलेटच्या दिशेनं
थरथरत्या पावलांनी धावत गेला

भायंदरच्या गटारातला किडा आहेस तू
किड्यांविषयी कोणी बाळगतो का आदर?
मला विचारायचा होता जाब
बजावायचं होतं, थांबव ही वळवळ
तत्काळ
हेच डॉयलॉग वदवून घ्यायचे होते
माझ्या तोंडातून
कसं पद्धतशीर जाळं रचलं होतं!
आणि कशी प्रीप्लान्ड शिकार झाली होती माझी!
ह्या धडपडीला आता काय अर्थ?
टोपलीतल्या माशाची फडफड
बघतात बघणारे
लुटतात मजा, मजा लुटणारे
काय तडफड आहे
वा! वा! ही घेतली उसळी
आपटला आपटला तोंडावर
कुणी दाबून बघतंय माझी गालफाडं
कुणीतरी जाणकार
लाल पाणी
सफेद पाणी
माझा तोल गेला होता का?
कारण कानांत सारखी अनाऊन्समेन्ट
कन्ट्रोल युवरसेल्फ....
हे माझ्या हिताचं होतं
मी सावरावं की
सगळ्या ऑफिसला माहीत व्हावं
बघा याची लायकी
हा सुशिक्षित
आणि तोंडातून वाहतेय गटारगंगा
हा कुणाचा आवाज?
ॲलिगेशन लेटरवर सही करणाऱ्या ब्रँच मॅनेजरचा
की त्याच्या हाताखालच्या ऑफिसरचा?
किती जण सामील या कटात?
आणखी एक धर्मीय?
बोगद्यातनं गाडी जावी तशी बधीरता

तसा काळोख काळोख काळोख
खड खड खड खड खड खड खड खड खड
आणि
तशातच दिसलं

खडखडाट रस्त्यांवरून
टांग्यातून आली होती माणसं
कोणत्यातरी युनियनची
ते आले होते आमच्या घरी
मी चढलोही नव्हतो अजून ऑफिसची पायरी
एक मेंबर मिळवायला केवढा खटाटोप!
त्याच वेळी
फॅमिली प्लॅनिंगची केस मिळविण्यासाठी
गावोगाव भटकणारा
माझा शिक्षकमित्र डोळ्यांसमोरून गेला
"एवढ्या लांबून अप-डाऊन करणार
तर स्टॅमिनाची पुरी वाट लागणार
एकाच दिवसात आमच्या कमरेचे
काटे ढिले पडले.
हरकत नाही.
आम्ही बघून घेऊ
जवळपासच्या ब्रँचसाठी आम्ही प्रयत्नशील राहू"
मी माझा स्टॅमिना लूज पडू दिला नाही
पाठदुखीची मजल गेली
एक्सरे काढेपर्यंत
नो प्रॉब्लेम - नथिंग टू वरी
एक्सरे इज ओके
नाही कसं डॉक्टर?
मला दिसतंय
मी घर सोडतोय सकाळी ६ वाजता ते
घरी पोचतोय रात्री १० वाजता
सकाळी ९ ला ऑफिसच्या
बंद दारासमोर बसतोय जिन्यात
मी लाथाडतोय रात्रभर जिन्यात
अंगाचं वेटोळे करून बसलेल्या कुत्र्याला
तरी त्याच्या ठिय्या आंदोलनावर नाही परिणाम
हलत नाही जराही
जायचं तर कुठं जायचं?
काही दृश्यं मनातून जाता जात नाहीत
आयुष्यातल्या एखाद्या
जख्मी क्षणी जिवंत होतात
सर्व गतकालीन परिस्थितीची जमवाजमव करत

खाडीतनं पकडलेले मोठे मासे
बाप खायला कधी ठेवायचा नाही
आम्हाला समाधान मानावं लागायचं
कोलवट अन् झारली, मोड्यांवर
म्हणून तर चूल पेटायची
भाताचा वास व्हायचा घरभर
सगळ्या आवडीनिवडी लिंपल्या होत्या
कॅलेंडर निपचित टांगलेलं कुडाच्या भिंतीवर
दिवस तारखेच्या एका चौकटीतून
दुसऱ्या चौकटीत जायचा
आम्हाला न विचारताच
चला कधीतरी ही चौकट मोडू
धरला बापाकडे हट्ट
सायकल सालव्या हाय
एक रुपयो दे माना
धरली माझी मान बापाने चुलीत
विझलेल्या राखेखाली कोठेतरी
जागा होता एक निखारा
काय जमाना आलाय
बापाला समजून घेत नाही पोर
आणि रुपयाएवढी मोहर उठवली
डाव्या हाताच्या कोपऱ्यावर
मला व्हायचं होतं उंच चांगलं सहा फूट
आणि ५ फूट २ इंचावर येऊन थांबलो

दुसरं असं की
मी पाहिलं माझ्या बापाला
जखडून ठेवतोय संधिवात
जमेल ती संधी घेत
शिलाई मशीनचं पायडल
घेऊ लागलेलं बापाची परीक्षा
वेदनेचं कापड सरकतंय बापाच्या हाडांतून
दरम्यान
कुठेतरी निर्दयी वारा येतो
आईचे मोकळे केस उडवतो
तिनं पहाटे उठून झाडून काढलेला
घराभोवतीचा सगळा परिसर
शहाण्या माणसाला जमेल हे?
शहाणा माणूस हे करू धजेल?
सारासार विचार करणाऱ्या शक्तीशी
तिचं बिनसतंय काहीतरी
नेमकं काय ते कळत नाही
ती केस पाठीवर

मोकळे सोडून सुसाट धावत सुटते
सख्ख्या मुलांना ओळखत नाही
एक मिनिटभर
जिनं सांभाळलेलं आम्हाला
९ महिने पोटात
कोणत्याही ऋतूची आच न येऊ देता
कोण परमेश्वर तिच्या मेंदूतले किडे खातो?
कोण परमेश्वर तिच्या रेटीनेचा
होकायंत्र फिरवतो?
बाप तिच्या पायांत साखळी अडकवेल
क्वचित तिच्या पाठीवर दोरीचे वळ
जितकी तोंडं
तेवढे उपाय
बाप सगळं करायचा
कठोर नव्हता तो, कठोर व्हायचा
एखाद्या भगताला कौल लावायचा
सातवी फायनल झालेला माझा बाप
आसपास कोणी नाही याची खातरजमा करत
रडायचा ढसाढसा
घरातले दिवे घालवून

मी आईला बघतोय धावताना साखळ तोडून
राममंदिराजवळच्या औदुंबराच्या आडून
आडून आडून
तो रस्ता माझ्या शाळेच्या येण्याजाण्याचा
अ आईचा
कितीतरी वेळा गिरवला, पण
उच्चारायचा कुठे?
आई फार कमी वेळा प्राप्त झालीय मला
बापाकडे बाया अंगातल्या चोळ्या काढून
दातात धरून पदर
मापासाठी द्यायच्या
पुस्तकातून डोकं वर काढून बघायचो की
झाकताना पदराने दिसायची त्यांची छाती
त्यांच्यात सुरू व्हायचा
माझ्या आईचा शोध

मला आता सांगण्यात आलंय
मी शांत राहावं, देवळात जावं
देवळाभोवती प्रदक्षिणांच्या माराव्यात रेघोट्या.
आजमावावी अध्यात्माची ताकद

माझ्याविरुद्ध जो आवाज उठतोय
त्याची निघून जाईल हवा
उठतोय जो धुरळा, तो बसेल
मला दिसू लागेल पूर्वीसारखं निरामय

स्निग्ध दिसेल निरंजनाची वात
उच्चपदस्थ अधिकाऱ्याकडे पाठवण्यात
येणारी तक्रार
विरून जाईल मधल्या मधे उदबत्त्यांच्या वलयासारखी
माझ्यावर नवा आरोप : जातिवाचक शिवी मारल्याचा
परावृत्त करील यातून परमेश्वराचा ध्यास
मी मूक संमती दिली ब्रँच मॅनेजरला
ठीक आहे. मंजूर.
आता ब्रँच मॅनेजर प्रसन्न होवो

मोसंबी छिलताना कधीतरी
वाटलं
कुणीतरी मला छिलतोय
मी सुटा सुटा होतोय फोडीसारखा
कुणीतरी त्याआधी मला कॅच करेल
उंच उडवून
माझा जीव धाकधूक धाकधूक
कुणीतरी पिणार मला
मला नीरस करून टाकणार
हरवून जाणार माझं मूळचं स्वरूप

मला हरवायचं नाहीये माझ्या आईला
बापाच्या सांधेदुखीवर
कोणतीतरी जाहिरात
नामी उपाय सुचवील नक्कीच
मी बाळगतो आशावाद
शिलाई मशीनला मी देईन विश्रांती
रिळाचा रोल संपला
केसबॉबिन, शांत हो

तुझ्या आतलं आता बाहेर ओकू नकोस
बाहेरच्या रिळाशी संगनमन करत
शिलाई, अब नहीं तो नहीं
भावांना मी भीक मागू देणार नाही
त्यांना ओझं होऊ देणार नाही दप्तरांचं
आणि त्यांचं मला

आणि तसं घडलं तर
खलाशांचं आयुष्य त्यांच्या वाटेला येणार
करपून जाईल उन्हात, थंडीवाऱ्यात
त्यांची कातडी
खांद्यांनाच खांदे द्यावे लागतील
पाण्याचे कॅन्स, डिझेलचे ड्रम
आणि डोली वाहून वाहून
दोन-दोन तीन-तीन दिवसांशिवाय
घराचं तोंड पाहायला मिळणार नाही
खोल समुद्रात कवीला गेल्यावर
आणि रेडिओवर हवामान खात्याचा
वादळाचा इशारा ऐकल्यावर
बाप साकडं घालील सत्त्वादेवीला
माही पोरा परत येऊ दे
तुला मी नवस करता
मला डोळे आले होते तेव्हा
त्याने पूजलं होतं देवीला
वाहिले होते चांदीचे डोळे
आणि लाकडाचे पाय
घरी कुणाचेतरी पाय दुखत होते तेव्हा.
बापाचा चुलतभाऊ
घेत होता वामकुक्षी
कर्रर वाजणाऱ्या खाटेवर
मुंबईहून आलेले
घराचा खांब कलला आणि त्यांच्या डोक्यावर....
मी रोखून धरला खांब पुढे होऊन
कौलारू छतानं रोखून धरलेला
श्वास सोडला
सुटलो एकदाचे
नाहीतर अटळ होता कपाक्षमोक्ष
मला सावरून धरायचा आहे खांब
आणि छताखालच्या रक्ताच्या नात्यांची आयुष्यं
सुरू होती मनात
त्याची पायाभरणी
पण
एक संपत नाही की दुसरी घटना तयार
आपल्या विरोधात मत द्यायला
आज पाणी नाहीये ऑफिसात
काल नव्हतं, नव्हतं परवाही
कालच्या परवाही नव्हतं
पंधरा दिवस आपली माणसं मातीमोल
पाण्याशिवाय,
पाण्याचं नुसतं ठिबकसिंचन
ऑफिसपेक्षा रेल्वेचा संडास बरा
नाकाला रुमाल
प्राणायाम उपयोगी आला इथे
हद् हो गयी हद् हो गयी
आता उभं राहायला हवं आंदोलन
आता उभं राहायला हवं आंदोलन
जो तो म्हणायला लागला
ज्याने त्याने केले काम ठप्प
कॅश काऊन्टर उघडा ठेवायची मागणी
धुडकावली आम्ही एकमुखानं
बिझीनेस ग्रोथ, सर्व्हिस सेक्टर,
कस्टमर डिलाइटनेस
आजही mp3 वाजवू नका आमच्यासमोर
आज बंद
बेसिक सुविधांबद्दल बोला
आम्ही घेणार नाही पेन हातात
चालतंय म्हणून किती चालवून घ्यायचं?
ढकलपंची
आज
उद्या
परवा
आम्हाला पाणी हवंय
वेळ पडली तर आम्ही पाणी दाखवून देऊ
ॲक्शन घेणार आमच्या विरोधात?
घ्या ना
काय करायचं ते करा वाकडं
वर्किंग क्लास युनिटी झिंदाबाद
AIIEA झिंदाबाद
AIIEA झिंदाबाद

आणि रोजचं टपालसुद्धा
पोस्ट ऑफिसात पोचणार नाही
कस्टमर्सना मिळतील लेट चेक
प्रीमिअम नोटिसा, रिमाइन्डर्स
आमचे प्रॉब्लेम्स सरळसरळ
कोण विचारात घेणार?
नाही नाही, हा कॉर्पोरेशनच्या मुळावर
येण्याचा प्रश्न नाही

तिच्याकडूनच आम्ही घेतोय जीवनसत्त्व
प्रश्न तत्त्वाचा आहे
आता माघार घेणं पोक्या माणसाचं काम
जयवंता, ठेव ती पोस्टाची बॅग खाली
तुला दाखवतायत इथे बदलीचा नैवेद्य
हे इमोशनल ब्लॅकमेलिंग
नकोस घालू भीक
इथून पुढे शिक
नकार द्यायला, जेव्हा तुला वाटेल
मनापासून द्यायला
AIIEA झिंदाबाद
जरी तुला जबाबदारीचं भान दिलं जाईल
तुला चारचौघांत NON-SENSE म्हटलं जाईल
जसं मला आता संबोधलं गेलंय
हे ऑफिसर्स
जे येतात आठवड्यातून तीन-तीनदा लेट
त्यांच्याकडे उत्तरदायित्व आहे
डीसिप्लिनचे डोस पाजायचे
- आणि
बँक मॅनेजरशी बोलायची वेळ आली
की घालतात शेपूट
- आप बँक मॅनेजरसे बात कर लो
उनका कॅशिअर ५०० के नोट
मायनर कट होनेपर नहीं लेता है
- तुम लेलो वैसे नोट
- आप मॅनेजरसे बात कर लो । पैसा मेरा ब्लॉक
होता हे, अगर नहीं लिया बँक के कॅशियरने तो
- तुम ले लो मैं कहता हूँ
मैं मॅनेजर हूँ
- आप तो जानते ही हो, मैं कॅशियर हूँ
नहीं लूँगा
बदली झाल्यावर नव्याने त्या जागेवर
येणाऱ्या ऑफिसरचे भरले जातात कान
रिले शर्यतीसारखे
झेंडे हस्तांतरित होत राहतात सारखे

मग टेबलावरची फुटलेली
काच पाहून का बघितलं जाऊ नये
माझ्याचकडे संशयानं?
ऑफिसरच्या चहातल्या साखरेचा मात्रा
कमी झाल्याला मी जबाबदार कसा काय?
जी अस्वस्थता खदखदतेय ऑफिसात
तिच्याखालचा जाळ मी आहे?
माझी व्याख्या होतेय.
लाकडी फर्निचरला लागलेली वाळवी
प्रोग्राममध्ये शिरलेला आगंतूक व्हायरस
मी सुसंस्कृत भाषेत शिरकाव केलेली शिवी
तुझ्या आयची गांड
मी म्हणालोही होतो त्या ऑफिसरला
त्या नाल्यातल्या किड्याला
त्याने मला पकडलेलं कोंडीत
फरफटत नेलं होतं मला
वेड लागण्याच्या टोकापर्यंत
माझ्या विचारशक्तीचं फाटक बंद पाडलेलं
मी नव्हतोच कुठे स्थिर
आणि ST/SC कंप्लेन रजिस्टरमध्ये
शॉकिंग नोंद
मी शिवी दिल्यानं
इश्यू केलेलं मला वॉर्निंग लेटर
हे कसं नाटक?
यात आधी शेवट दाखवला गेला
आणि संगती लावलेली प्रत्येक दृश्याची
सोयीस्कर काटछाटीसह.

डोक्यातनं काहीच हद्दपार होत नव्हतं
सगळंच थांबलेलं ट्रॅफिकसारखं
फक्त हॉर्न तेवढे सुरू युनियन लीडर्सनी सांगितलेलं
काही काळजी करू नका.
तुम्हारा एक भी बाल बाँका
नहीं होने देंगे हम
अट एकच
त्यांनी आखून दिलेल्या सूचनांवरून
टाकायची पुढची पावलं
काही लेटर्सवर सह्या
आणि ब्रँच मॅनेजरकडे करायचे पोच
मला हवं होतं आश्वासन
माझी नोकरी टिकली पाहिजे
माझ्या प्रमोशनचा प्रोबेशन पीरिएड वाढला
वाढू दे
माझी नोकरी जाता कामा नये

माझा बाप
माझी आई
माझी बहीण
माझे भाऊ
प्रश्न माझ्या एकट्याचा नव्हता
माझी नाही बोट ना शेतीवाडी मालकीची
माझी शेतीवाडी माझी नोकरी नोकरीच माझी बोट
युनियन लीडर्सनी ब्रँच मॅनेजरच्या केबिनमध्ये
चहा घेतल्यावर का वाटू लागलं
मी बाजी हरलोय?
का पटू लागलं मनोमन
मी बाजी हरलोय?
हरलेल्या मन:स्थितीत
मला ऐकायला येत होतं
युनियन लीडर्सचं बोलणं
एका शाखेत एका असिस्टन्टने
पकडली कॉलर ऑफिसरची
नाटक नहीं करने का
अच्छे तरीके से बर्ताव करना मेरे साथ
अगर फिरसे उंगली की, तो देख लूँगा
ऑफिसर काय उखडणार त्याची?
कारण काय, तर त्याला ठाऊक होतं
युनियन पाठीशी आहे
मग भ्यायचं कशाला?
पण अलर्ट राहायचं
आजुबाजूला ऑफिसातला कोणी नाही
याची करायची आधी खातरजमा
नंतरच मुद्द्याला  घालायचा हात
अन्यथा
साक्ष काढून नोकरीतून आपल्याला
मोक्ष
मी अलर्ट होत
आजुबाजूला पाहत
रेल्वेस्टेशनवर प्रकट झालो भरगर्दीत
हातांना थरथर. थोडासा घाम
अनुभव नाही हातांना, घामाला, थरथरीला
त्या थरथरीत ब्लेडचं नवं कोरं पातं
आपली चमक लपवू शकत नव्हतं
त्याला दिली होती ऑर्डर
दिसला मॅनेजर की त्याच्या गांडीवर वार
सपासप
बोलव आता तुझा संकटमोचन परमेश्वर
तुझा गुरू कोल्हापूरवासी
मी वाट पाहिली
मला लागलेली तहान
मी इकडे पाहिलं
माझी मान दुखली. हा सरावाचा अभाव
मी तिकडे पाहिलं
माझी मान दुखली. हा अभावाचा सराव
मान दुखतच राहिली इकडून तिकडे
मॅनेजरची घागर येताना
कुठेच दिसत नव्हती
डोक्यातले दगडगोटे अस्वस्थ
हातातलं ब्लेड निराश
कधी पिसासारखं गळून पडलं कळलं नाही
कसं जमवून आणलं होतं सगळं
आणि अखेरच्या क्षणी
माझी गोष्ट अपूर्ण राहिली
तात्पर्य : निराशेमुळे काहीच घडत नाही
हाफ मर्डर टळतो
संधी मिळाली असती तर
मी ब्लेडइतकाच क्रूर झालो असतो का?
डोक्यातल्या दगडांना आली असती
ब्लेडची धारदार चमक?
मी सुखानं उडून गेलो असतो
तहान भागल्यावर
की दुसरी घागर असती शोधली
नंतर तिसरी
नंतर नंतर
तशी संधी आली होती
पण जरा फरक करून
वेळ मागची नव्हती
तो काळ सरलेला होता
मॅनेजरची ठीक नव्हती तब्येत
त्याला स्टेशनपर्यंत सोडायला, भाग होतं
कुणीतरी सोबत असणं
खुरडत खुरडत चाललेला ब्रँच मॅनेजर
लंगडीचा खेळ खेळत असल्यासारखा
लंगडा करायचा का आता?
ह्याच्या पेकाटात लाथ सणकावून

म्हणजे जन्मभर याद राहील माझी
की देऊ ढकलून प्लॅटफॉर्मवरून
डायरेक्ट रेल्वे ट्रॅकमध्ये
संधी चालून आली होती आपल्या पायांनी
पण कुणीतरी रोखत होतं मला
मी ओळखत नाही तो कोण होता माझ्यात?
कुणीतरी रोखत होतं खास मला
मला सांगत होता
तुझी हिंस्त्रता मुळापासून उपटून टाक
असं कसं?
हिंस्त्र व्हायला पाहिजे कधीतरी
नाहीतर शेणाचा गोळा व्हायला कितीसा वेळ?
साप सौम्य वागू लागला तर
जन्माला आलेलं पोरही
काठीनं ढोसू लागेल त्याला

गंदी नाला कीडा टाइप अधिकाऱ्याची
झाली बदली
ब्याद टळली
शिकवायचा ह्याला धडा?
की शेकेल आपल्याच अंगावर?
हाही सांगायचा आगाशीतल्या
रिक्षावाल्यासारखं
माझ्या वाटेत कोणी येऊ नका
खपवून नाय घेणार
सरळ पोलिस स्टेशनात लिहून देईन
हा बाबासाहेबाच्या तसविरीवर मुतला
बाबासाहेब, तू प्रत्येक प्रश्नाचं उत्तर त्यांच्यासाठी
एका ख्रिश्चन ऑफिसरची
मी भररस्त्यात अडवली ल्यूना
दाखवावी थोडी दहशत
बसवावी थोडी जरब
माझ्या विरोधात करू नये याने मतदान
मी उभे आडवे हात मारत होतो अस्तित्वाच्या पाण्यात
रक्ताची नाती अंगाखांद्यावर वागवताना
दमछाक दमछाक
हाच ऑफिसर आला होता
टांग्यातनं घरी मला युनियन मेंबर
करून घ्यायला
आणि माझा वचपा काढला वेळ साधून

पण असं करायचं कारण काय?
त्याचीही युनियन आधीची नव्हती राहिलेली
त्याला प्रमोशन मिळाल्याने
मी फिरवला त्याच्या गाडीचा मिरर
"हात लावू नकोस. बिघडून जाईल"
५ रु. चा मिरर फिरवल्यावर एवढा राग
तुम्ही माझं आयुष्य बर्बाद करायला निघालेलात
माझ्या कित्येक रात्रींना
तुम्ही जागरणांचे शाप दिलेत
माझ्या डोळ्यांत डिपॉझिट केलेत
काळजाला ताण देणारे जीवघेणे भास-आभास
आणि सर्व स्वप्नांना
कुठेतरी बेटांवर सोडून आलात
एकामागून एक हॉर्न पुढून-मागून
माझी ताकद वाढू लागली
ते चीअर्स करताहेत
मला वाटलं, ते आगे बढो म्हणत आहेत
मी शरणागताला दिली वाट करून
मोठ्या दिलानं
जा घरी आता
तकलीफ देणं बंद करा
कन्फेशन बॉक्समध्ये उभं राहिल्याने
येशू क्रुसावरून उतरून
जगाचा उद्धार करणार?
मी मिरवणार नाही एकही खिळा
माझ्या देहावर
लटकवणार नाही कोणाचाही बिल्ला
जी माझ्या विचारसरणीला धरून नाही
ती सोडू शकतो मी युनियन
मी युनियन सोडली म्हणून एवढा राग?
कॅशिअरसाठी मला का तयार केलं
माझी इच्छा नसताना?
मला डायरेक्टली बदलीपासून
का वंचित केलं?
आणि भाजली तुम्ही पोळी तेलतूप लावून.

मी करपत चाललो होतो दिवसेंदिवस
काय फायदा पोच करून ब्रँच मॅनेजरला
युनियनची पत्रं?
मला मुळातून वाटत नव्हता युनियनचा आधार

कांद्यासारखा महाग झाला होता
उभारीचा साधा शब्द
आणि शाखेत सुरू होतं माझं खच्चीकरण
चक्कर आलेल्याला हवी असते
मोकळी हवा
त्याच्या नाकाशी कांदा
किंवा चामड्याची जुनाट चप्पल
मला तसे हवे होते धीराचे बोल
ओहोटीच्या पाण्याखालनं खचते वाळू
तसा माझा धीर खचत चाललेला
हाताची बोटं तुटून
सापासारखी दूर पळायला लागली
कोरडे पडायला लागले डोळे
उन्हाळ्यातल्या आटणाऱ्या तळ्यांप्रमाणे
जमा होऊ लागलेला डोळ्यांभोवती
काळ्या वर्तुळांचा जमाव
त्यांच्यातली सर्व दृश्यं
झाली गायब
आई म्हणायची
तून जेवन केव कमी केला
म्हावरा नय खाय
राशी-पातेराशी उठून बहता आथरुणान

कॉलेजने एकदा मला बजावली होती नोटिस
माझ्यामागे बसलेला स्टुडण्ट
कॉपी करत होता
माझी पेपर पकडायची पद्धत तशी होती
सुपरवायजरच्या दृष्टीतनं आक्षेपार्ह
माणसामाणसांत किती गोष्टी आक्षेपार्ह असतात?
त्याचं मग काय करायचं?
मी सुटलो सहीसलामत
पण नोटिस हातात पडल्यावर
मी केलं होतं घरच्यांना घुमजाव
तिथूनच थोडी हिम्मत उचलली मी
परिस्थितीशी भिडायला
आता ह्या घडीला काय सांगायचं?
नोकरी मला ठेवायला येणार आहे स्टेशनपर्यंत? बाय.
बाय.
मांजरासारखं गोणीत भरून गावाबाहेर सोडणारेय
की परागंदा करायला लावेल

आपल्या हद्दीतून कायमसाठी
तू नहीं तो और सही

माझी उदासीनता
मला काट्यावर घेण्यासाठी
पुरेशी होती युनियनला
मी वेळीच दिलं असतं
ब्रँच मॅनेजरला पत्र
तर वेगळ्या परिस्थितीचं घडलं असतं दर्शन
ब्रह्मांडच तोंडासमोर
डिव्हिजनल ऑफिस पाठवतं मला कामाचं प्रशस्तिपत्रक
आणि ब्रँच ऑफिस उठवतं मोहर कामचुकारपणाची
आणि पुन्हा डिव्हिजनल ऑफिस
पाठराखण करते ब्रँच ऑफिसची
कोण डिटेक्टिव शोधून काढणार
यामागची वस्तुस्थिती?

माझी उदासीनता
मला चांगली शेक देतेय
मी पडू नये कुठेही कच्चा, अर्धकच्चा
मी नाकारायला हवा होता
माझा पेनडाऊन आंदोलनातला सहभाग
रोखायला नको होतं प्यूनला
पोस्टात जाण्यापासून
काय मिळालं?
आंदोलनात सर्व सहभागी
पण तक्रार माझ्याविरुद्ध झाली
पाणी काय मला एकट्याला हवं होतं?
मला पाण्यात ढकलून
सर्वजण किनाऱ्यांवर पोचलेले सुखरूप
गणपती बाप्पा मोरया
मी अजून हातपाय मारतोय
मला वाचवा यातून मी थकलोय
भरती आहोटीसारखी
दिवसांची ये-जा
मला कुणी वाचवणार व्यर्थ अशा
तशी इच्छाही कोणी प्रकट करता कामा नये
जारी झालं आहे फर्मान
कुणी व्हायचं नाही पुढे
बुडू दे त्याला
मरू देत

मला पाणी भोवलं होतं
मी सापडलेलो भोवऱ्यात
कुणाच्या मर्जीनुसार
मी मागे-पुढे झालो नाही त्याची ही जबराट शिक्षा
बदलला नाही माझा रंग
कुणाच्याही मूडनुसार
मी पुटपुटत राहिलो नाही
ॐ साहेबाय नम:
कुणाच्या नावानं घंटानाद दूरच राहिला
मी साधा भंडाराही उधळला नाही
ओवाळायच्या कशाला असतात महाआरत्या?
न बेटिंगरूम झालो
न अनाउन्समेन्ट
मी अपडेट केला नाही साहेबाचा
जगण्याचा डाटा
आणि विमाएजन्टांना फालतू चौकशीत
गुंगवून त्यांची मती भरकटवली नाही
टोपलीभर चिकू केवढ्याला पडतात?
तुमच्याकडे जांभळाची गावठी वाईन मिळेल?
तुमच्या उपवासाचे वार सोडून
येईन मी लंचला
मजबुरी आहे
व्हेजची आतड्याला सवय नाही
कॅशिअर असताना मी सोडला चहा
आपण चहा घेणार
आणि रांग टुकटुकत बघत बसणार
अच्छा नहीं लगा
लगना भी नहीं चाहिये था।
इतके दिवस ऑफिसात असूनही
पारख कशी करता येत नाही माणसांची
लोकल युनियन लीडर्स
वारंवार दिसू लागलेले ब्रँच मॅनेजरच्या केबिनमध्ये
संशयाचे पडदे हेलकावताना पाहिले मी काचेवर
वर ते
माझ्यासोबत असल्याचे पुरावे देत
हे बघ टेलीफोन बिल
आज अमक्या लीडरशी बोललो
काल तमक्या
विषय हाच : तुझा
शत्रूच्या गोटात शिरून जाणून घ्यायचं रहस्य
आणि मग एकदम हल्लाबोल
आता माघार नाही घ्यायची
तू हिम्मत दाखवलीस,
कुणात आहे एवढी डेअरिंग?
मी कोणत्या शब्दांवर विश्वास ठेवावा?
कोणते अर्थ दिशाभूल करणार नाहीत?
वॉर्निंगलेटर मला इश्यू करणार
हे माहीत होतं ज्या दोघांना
तेच कसे, घरी निघून गेले लवकर
नेमक्या त्याच वेळेला?
मी कसं मानावं, हा निव्वळ योगायोग होता!
सिगरेटीची वलयं विरून गेली दुसऱ्या दिवशी
रिकाम्या झालेल्या व्हिस्की, बीअरच्या बाटल्या
भंगारवाला घेऊन गेला फुकटात
शब्दांनी आपले मेक-अप बदलले
आदल्या रात्रीचे
मी माघार घ्यावी
जो तो शहाणपणानं सुचवू लागला
माझ्या गैरसोयीच्या ठिकाणच्या बदलीची शक्यता
याचा वास ज्याच्या त्याच्या तोंडाला
जिथून शक्य होणार होतं फक्त
घराशी माझा पत्रातून संपर्क
जेवढ्यास तेवढं बोलणं
मी इथं ठीकैय
तुम्ही कसे?
मी लवकरच येईन
पत्र लिहीत जा.
बदलीचं बघतोच आहे
तोपर्यंत आईनं, बापानं लावला असेल बोल
गणेश इंजिनीअर कंपनी बंद करताना
मालकानं बापाला बोलावलं होतं रात्री
मोजक्या युनियन लीडर्सशी
मांडवली करणार होता मालक
तर कुणीतरी मेला मुसलमान
कडमडला मधेच
त्याची इन्सानियत झाली जागी
ती काय इन्सानियत जागी होण्याची वेळ होती?
नहीं चाहिये हमे ये पैसा
कंपनी बंद करनी है तो करो आप
हमे गरीब की हाय लग जायेगी

थोडेफार पैसे गाठीशी असले तर
बोलावलं असतं मुलाला परत
घे उपनगरात गाळा.
किराणा माला दुकान टाक
या धंद्याला नाय मरन.
आणि
नोकरी सोडून जागच्या जागी
परतावं गावी तर
लोक वेडंवाकडं बोलतील, ते सोडून देऊ तरी
सगळं नव्यानं झेपणार होतं का?

जाळी विणल्या
कमरेचा काटा ढिला होईपर्यंत
तेव्हाची गोष्ट वेगळी होती
समुद्रात डुबकी मारून
काढली रेती श्वास रोखून
तेव्हाची गोष्ट वेगळी होती
माग ओढले पाठीला रग येईपर्यंत
मासळीच्या कावडी वाहिल्या
तेव्हाची गोष्ट वेगळी होती
बांधले बोंबलाचे भारे
कुट्याच्या गोणीत थयथय नाचलो
ओव्हरटायमाला एका वडापावसाठी
तेव्हाची गोष्ट वेगळी होती
आता कोण पत्करेल
एका वेळच्या जेवणाची भ्रांत?
तेव्हाची गोष्ट वेगळी होती
की भाऊ पास झाल्यावर सातवीची स्कॉलरशिपची परीक्षा
काळे ठिपके पडलेल्या आरशासमोर
आम्ही दाणदाण नाचलो
कारण त्या दिवशी पहिल्यांदाच
घरात ५० किलो तांदळाचं डोळेभरून आम्ही घेतलं दर्शन

वर्तमान मागचं सगळं
जसंच्या तसं स्वीकारेल
याची कोण देणार गॅरन्टी?
त्याहून सोपं
साहेबाचं बोलणं मान डोलवून ऐकणं
सोपं कोल्हापूरवासी गुरूच्या
शिष्याचा आदेश पाळणं
देवळाभोवतीच्या रेघोट्या
आणि साहेबाच्या जयजयकाराची त्यांना झालर चढवणं
कुणी साहेबांबद्दल नाराजीचा सूर लावला
की तडकाफडकी हस्तक्षेप करत
अख्ख्या ऑफिसला कळेल
अशा आवाजात विरोध करायचा
सोडायची नाही एकही संधी
साहेबाबद्दलची आपली निष्ठा प्रकट करायची
मन नि:शंक राहायचं की
कॉन्फिडेन्शिअल रिपोर्टमध्ये
आपल्या चिकण्या प्रतिमेचा पुनर्जन्म
सोपं आणि शक्य
ऑफिस सुटतानाच्या आधीची दहा मिनिटं
बसून राहणं
शेवटच्या दहा मिनिटांत ५० वेळा
घड्याळाकडे दृष्टी फिरवून टेबलाचा तबला वाजवणं
सोपं हे सर्व
जातभाईच्या आयुष्याहून
जे जातात मासेमारीला
खोल समुद्रात
जिथे दूरदूरपर्यंत दिसत नाही डोंगरांची
पुसट रेघही
आणि दोन पावलं टेकवता येतील
एवढा जमीनीचा तुकडाही
तीन-तीन, चार-चार दिवस
घरच्यांचं तोंड बघायला नाही होत
बिनभरवशाच्या लाटांवर
हेलकावतात दर्याच्या राजांची आयुष्यं
कवीला जाताना ते ऐकवतात
आय बापाला -
घरा येन ता तुयो पोर
बायकोला -
घरा येन ता तुयो नवरो
या यो बापू
नय ता नय
सोप्या ध्येयासाठी
निवडला मी धोपट मार्ग
मी कलिगशी बोलणं टाकलं
चांगलं बोलायचं
मोजकं बोलायचं
सद्सद्विवेकबुद्धीची झीप ओढून

शब्दानंच शब्द वाढतो
वाक्यं होतात
ती निष्कर्षाला पोचवतात
मला पोचायचं नाही निष्कर्षाच्या डेड एन्डपर्यंत
मी शब्द छाटत गेलो
नवे प्रश्न निर्माण होतील
म्हणून टाळत गेलो उत्तरंही
कलीग हो
मी आता मागे फिरतोय
आता तुम्ही आणि तुमची युनियन
धिस इज नॉट माय राइट पाथ
किसीने नहीं किया मेरा बाल बाँका
पण प्रोबेशन पीरिअड लांबला तो लांबला
कन्फर्म झालो नव्या श्रेणीत
तेव्हा जीव भांड्यात पडला
बघा बघा
गोष्टीचं पुस्तक सोडून
कावळा जंगलाच्या दिशेनं उडू लागलाय
या युनियन लीडर्समागचं
सगळं आठवून मनाला लावून घेऊ नका
चला, आपण चहा पिऊ
तुम्ही ब्रँच मॅनेजरच्यासोबत घेतला होता
त्याविषयी संकोच सोडून द्या
हे खरंय की
शिक्षा संपते पण
सहज पुसता येत नाही आरोग्यचा कलंक
यापुढे मला नेहमीच
घ्यावी लागणार माघार
माझी रहस्यं सापडल्याची नोंद
ऑफिसच्या फायलीत
वेळ पडली तर ते त्यांचीच बनवतील मूठ
जी कधीही लागू शकते
माझ्या नाकावर
ॐ शांती शांती शांती

■

अभिधानंतर दिवाळी अंकातील संजय कुंदन यांच्या पाच कवितांचा हिंदीतून अनुवाद बलवंत जेऊरकर यांनी केला होता. अनावधानाने हा उल्लेख राहिला होता. याबद्दल आम्ही दिलगीर आहोत.


# दि न्यू इंडिया ॲश्युरन्स कंपनी लिमिटेड

**भारतातील सर्वात मोठी साधारण विमा कंपनी**

दि न्यू इंडिया ॲश्युरन्स बिल्डिंग
८७, महात्मा गांधी मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
दूरध्वनी : २२६७४६१७, २२६७४६२२



# दुसऱ्या नवतेच्या समर्थ कवीचा सन्मान : ज्ञानपीठ

**श्रीधर तिळवे**

विन्दा करन्दीकर ह्यांना मिळालेले ज्ञानपीठ हा मराठी भाषेचा झालेला सर्वात मोठा सन्मान होय. तो थोडासा उशिरा झाला हे खरे, पण त्यामुळे मराठी माणूस आनंदून गेला. सर्वत्रच विन्दांचे अफाट कौतुक झाले. अर्थात, ते ह्या कौतुकाला पात्र होते ह्याविषयी कोणालाच शंका नव्हती/नाही. आता ह्या सन्मानानंतर बरेच पाणी वाहून गेले आहे. त्यामुळे विन्दांना हा सन्मान का मिळाला असा प्रश्न विचारायला हरकत नाही. हा प्रश्न विचारण्याचे कारण ह्या सन्मानाला मिळालेल्या दोन प्रतिक्रिया आहेत. (म. टा. दि. १९/०१/०६)

त्यातील एका प्रतिक्रियेचा सारांश असा की, मंचावरून कविता वाचणाऱ्यांचा हा सन्मान असून मंचीय कवी म्हणून जे लोक मंचीय कवींची हेटाळणी करतात त्यांना मिळालेले हे उत्तर आहे.

दुसरी प्रतिक्रिया म्हणजे, विन्दा करन्दीकरांनी साहित्याला दिलेले जे योगदान आहे त्यासाठी हा सन्मान आहे.

विन्दा करन्दीकरांनी आमच्या मते मंचावरून भरपूर काव्यवाचने केली हे सत्य असले तरी ते मंचीय कवी कधीच नव्हते. आमच्या मते, मंचीय कवी या शब्दाचा अर्थ, जे मंचालाच 'साध्य' समजतात आणि मंचावरून लोकांना आवडेल अशीच कविता लिहून ती सादर करतात ते मंचीय कवी होत. ह्याउलट, जे मंचाला 'साधन' समजतात आणि मंचावरून स्वत:ला पटेल अशीच कविता लिहून ती सादर करतात त्यांना सुमंचीय कवी म्हणतात. ह्याउलट, कवीचा तिसरा एक प्रकार आहे. त्यांना आपण 'हस्तिदन्ती' कवी म्हणू. हस्तिदन्ती कवी म्हणजे जे कविता लिहितात, पण ज्यांना लोकांत येऊन मंचावरून कविता वाचणे हे कमी दर्ज्याचे वाटते, असे कवी. अर्थात, हे प्रकार वर्णनात्मक आहेत, मूल्यात्मक नाहीत हे सांगायला नकोच. एखादी मंचीय कविता ही श्रेष्ठ कविता ठरणारच नाही असा भ्रम कोणीच बाळगू नये.

विन्दा करन्दीकर हे ह्या अर्थाने सुमंचीय म्हणजे मंचाचा वापर सु म्हणजे चांगली कविता सादर करण्यासाठी करणारे कवी आहेत. ते कधीच मंचीय कवी नव्हते आणि नाहीत. हे इतकं विस्तारानं सांगण्याचं कारण असं की अनेक चारोळ्या लिहिणाऱ्या दुय्यम कवींना ज्ञानपीठाची स्वप्ने पडू लागली असतील तर ती पडू नयेत. ज्ञानपीठ म्हणजे मराठी साहित्य संमेलनाचा फड नव्हे की जो कोणालाही उपलब्ध होईल.

मला इथे मंचीय कवितेचा अपमान करायचा नाही. जनमानसात कविता पोचवण्याचे व कविता लोकांच्यात

टिकवून ठेवण्याचे त्यांचे प्रयत्न हे अतिशय मोलाचे आहेत हे मला मान्य आहे. मला फक्त इतकेच सांगायचे आहे की करन्दीकरांना 'मंचीय' कवितेच्या घराण्यात घालू नका. तो 'सन्मान' पाडगावकर व बापट ह्यांना द्या. अर्थात, करन्दीकर हे केवळ मंचावरून कविता वाचतात म्हणून त्यांची हेटाळणी करणाऱ्या काही हस्तिदन्ती कवींना मात्र हा पुरस्कार थोडा विचार करायला लावेल अशी आशा वाटते. मी स्वत: ह्याबाबत करन्दीकरांना प्रमाण मानणारा कवी आहे आणि सर्व चांगल्या मंचांची हेटाळणी थांबवून सुमंचीय कवी व्हावे असे माझे मत आहे. (मी 'चौघांच्या कविता' ह्या कार्यक्रमात त्यामुळेच भाग घेतो.)

आता हे ज्ञानपीठ ज्यामुळे मिळाले ते कारण! माझ्या मते विन्दांना हा पुरस्कार मिळाला, कारण त्यांनी दुसऱ्या नवतेची लिहिलेली अतिशय सर्वव्यापक अशी कविता होय. पहिल्या नवतेच्या केन्द्रस्थानी 'नवजागरणता' किंवा तिसऱ्या नवतेच्या केन्द्रस्थानी 'देशीयता', तर आत्ताच्या चौथ्या नवतेच्या केन्द्रस्थानी चिन्हीयता आहे, तशी दुसऱ्या नवतेच्या केन्द्रस्थानी 'आधुनिकता' आहे. करन्दीकरांचा सन्मान हा करन्दीकरांनी आधुनिक नवतेला दिलेल्या योगदानाचा सन्मान होय.

मुळात, परंपरा आणि नवता ह्यांच्या संबंधाचा विचार हा प्रथम करन्दीकरांनी केला. त्यांनी मर्ढेकरी व केशवसुती नवतांचा सांगोपांग विचार केला. हाच विचार पुढे नेत मी मग देशीय व चिन्हीय नवतांचा विचार मांडला. नवतेबद्दलचे करन्दीकरांचे विवेचन हे मूलगामी आहे (पाहा, परंपरा आणि नवता गो. वि. करन्दीकर, पॉप्युलर प्रकाशन, पा. क्र. १ ते १३) करन्दीकरांपूर्वी मराठी समीक्षा 'कालिकते'मध्ये घुटमळत होती. त्यामुळे प्राचीन, अर्वाचीन किंवा १९०१ ते १९२० वगैरे अशा पद्धतीने मराठीत साहित्यविचार चाले. दुर्दैवाने पुढे परंपरेला प्रमाण मानणाऱ्या काही देशीवाद्यांनी व नव्वदनंतरच्या काही कवींनी पुन्हा कालिकतेचा विचार पुढे आणून 'साठोत्तरी', 'नव्वदोत्तरी' 'ऐंशोत्तरी' असा कालिक विचार पुढे आणला. करन्दीकरांनी ह्या कालिकतेला छेद देऊन नवता ही अत्यंत मूलगामी संकल्पना मांडली. हे करताना त्यांनी अपूर्वता व नावीन्यता ह्या गोष्टी नवतेपेक्षा कशा भिन्न आहेत ते सांगितलेच, पण नवतेचेही सांगोपांग विवेचन केले. त्यांच्याच भाषेत सांगायचे तर, 'नावीन्य म्हणजे परंपरेवर विशेष खोलवर संस्कार न करणारे आणि कलाकृतीमध्ये अंगभूत व अनिवार्य न भासणारे अस्थायी वेगळेपण होय. नवता हे वेगळेपण याहून फार भिन्न प्रकृतीचे असते. नवता हे वाङ्मयीन विकासाच्या क्रांतिकारक अशा महत्त्वाच्या टप्प्यावर अनिवार्यपणे प्रकट होणारे वेगळेपण होय. नव्या युगाची नांदी गाणारी ही नवता म्हणजे एखाद्या व्यक्तीने आपल्या स्वैर प्रतिभेतून निर्माण केलेले संदर्भहीन वेगळेपण नसते किंवा स्वत:कडे स्वतंत्रपणे लक्ष वेधून घेणारी उपरी टूमही नसते. तसा काहीसा आभास क्वचित प्रसंगी निर्माण झालाच तरी लवकरच ती एक सामूहिक व सामाजिक स्वरूपाची घटना आहे. एकापेक्षा अनेक व्यक्ती ह्या पद्धतीने कार्यान्वित होत आहेत. बदलत्या ऐतिहासिक संदर्भाशी व व्यक्तिनिरपेक्ष व्यापक घटनांशी हे वेगळेपण संबंधित आहे याचा प्रत्यय लवकरच आपणाला येऊ शकतो.' (उक्त, पृ. ४-५)

दुसरी आधुनिक नवता ही वरीलप्रमाणेच होती. मात्र ज्यावेळी करन्दीकरांचे अनेक समकालीन कवी (ह्यांना पन्नासोत्तरी म्हणावे का?) नावीन्य जोपासत होते तेव्हा विन्दा हे मर्ढेकरांनी आणलेली नवता संपन्न करत होते. मर्ढेकरांची आधुनिकता, माधव ज्यूलीयनांची प्रयोगशीलता शरद्चंद्रांचा मार्क्सवाद आणि मनमोहनांचा वेदांती तिरकसपणा ह्यांचा अपूर्व संगम आपणाला त्यांच्या कवितेत दिसतो. त्यांनी परंपरेने पुरवलेली काही तंत्रे थेट वापरली (उदा. अभंग), काहींना स्वत:चा आयाम दिला (उदा. गजल, मुक्त सुनिते), तर काही स्वत: घडवली (उदा. स्वच्छंद किंवा विरुपिका). तंत्राबाबतचे त्यांचे कार्य हे काहीसे संत एकनाथांसारखे आहे. संत एकनाथांनी जशी ज्ञानेश्वरी पुन्हा शोधली, तसे करन्दीकरांनी अमृतानुभव पुन्हा शोधले, इतकेच नव्हे, तर पुढे जाऊन त्याचे अर्वाचिनीकरण केले. वास्तविक, मर्ढेकर आणि ते ह्यांच्यात वयाचे फार अंतर नव्हते, पण मर्ढेकरांच्या अकाली निधनामुळे आधुकितेची जबाबदारी त्यांच्याच खांद्यावर पडली आणि त्यांनी ती समर्थपणे सांभाळली. मर्ढेकरांप्रमाणेच करन्दीकरांच्या काव्यपिंडाचा मूलधर्म चिंतनात्मकता हा आहे. चिंतनात्मक काव्यपिंडातून विचारांबरोबर भावना, संवेदनांची अपरिहार्य व अर्थवाही निर्मिती होते. मात्र मर्ढेकरांप्रमाणे ते फक्त संयतशील नाहीत, तर निर्भरशील आणि अनुभवाच्या काठावरून उतू जाणारेही आहेत. मर्ढेकरांप्रमाणेच त्यांचा काव्यपिंड बहुपेडी असल्याने कवितेतील इतर अनुभव एकमेकांवर आघात करत मुख्य अनुभवावरही आघात करत राहतात. ते मर्ढेकरांप्रमाणे एकपिंडी नाहीत, तर बहुपिंडी आहेत. मर्ढेकरांच्या एकपिंडीपणाचे अनिष्ट परिणाम मराठी काव्यावर झाले. दिलीप चित्रे, विलास सारंग, वसंत डहाके, भालचंद्र नेमाडे ह्या सगळ्यांनी एकपिंडी असणे हे ग्लोरिफाय केले, पण त्यामुळे कवितेतला कवीचा मी हाच एकमेव निवेदक बनला. करन्दीकरांनी ह्याबाबत जे म्हटले ते आजही लागू पडते. ते म्हणतात, 'मर्ढेकरी कवितेच्या या मर्यादेमुळे

नव्या मराठी समीक्षेतील आत्मनिष्ठा व प्रामाणिकपणा यांच्या कल्पना फारच उथळ राहिल्या'. (उक्त, पा. क्र. १९९) साठोत्तरीमुळे त्या आजही तशाच राहिल्या आहेत. असो.

मर्ढेकरांच्या कवितेतील प्रतिमासंघात १) विरुद्ध धर्माच्या व विरुद्ध गुणसूचक प्रतिमांचे एकत्रीकरण २) संदर्भसंक्रमण ३) रूपविपर्यय ४) केन्द्रचलन ५) अर्थानुप्रास ही विन्दांनी दाखवलेली वैशिष्ट्ये त्यांच्याही कवितेत आढळतात. विन्दांच्या काळात सामान्य जनता अमर आहे असा दृढ विश्वास होता. लाल क्रांतीचा स्वार येतोय ही श्रद्धा होती. मानवाचे अंतिम एकच गोत्र अशी मानवतावादावर निष्ठा होती. अज्ञेयाविषयी 'अहंकार जाई अज्ञेया शरण मातीचे हे कण हसताती' अशी विकलांगता होती. 'सद्‌गुरूवाचोनी सापडेल सोय'मध्ये म्हटल्याप्रमाणे पायथागोरस, न्यूटन, आईन्स्टाईन, मार्क्स, फ्रॉईड, डार्विन वगैरेंच्या विचारांचे वारे वाहात होते. हुतात्म्यांविषयी 'पण हे श्रेय तुझेच आहे' असा गौरव मनात होता. मध्यमवर्गाचे तेच ते तेच ते असे रुटीन होते. त्याची धाव 'दातापासून दाताकडे' होती. करन्दीकरांनी ह्या सर्व गोष्टी कवितेत ओतल्या. मात्र मर्ढेकर जसे पुढे आध्यात्मिक झाले तसे करन्दीकर मात्र कधी आध्यात्मिक झाले नाहीत. ते जाणीवलक्ष्यी, पण जडवादीच राहिले. 'तीन प्रवासी', 'पिसाळलेल्या उग्र खुन्यासम'सारख्या काही अतिवास्तववादी कविताही विन्दांनी लिहिल्या. मी प्रिय विन्दा ह्या निबंधात म्हटल्याप्रमाणे मराठीत आधुनिक दीर्घकविता सुरू करण्याचे श्रेय विन्दांचेच आहे. संगीत आणि कविता ह्यांचे आंतरिक नाते उजागर करणारी 'तालचित्रे' ह्याही विन्दांच्या वेगळ्या कविता आहेत.

करन्दीकरांच्या कवितांचा प्रभाव बापट आणि पाडगावकरांसारख्या समकालीनांवर उघड उघड पडलाय, पण त्यांच्या प्रभावाची एक रेघ थेट दिलीप चित्रेंच्यांपर्यंत येऊन ठेपते. दिलीप चित्रेंच्या खाली एक खांदा पु.शि. रेगेंचा असेल, तर दुसरा विन्दांचा आहे. स्त्री-पुरुष सबंधांतील ऐहिक मस्ती आणि पिसाटी ही विन्दांच्या कवितेतून चित्रेच्यांत झिरपलेली दिसते. करन्दीकरांच्या दीर्घ कविता साठोत्तरीने आदर्श म्हणून मिरवल्या नाहीत, तरी आधुनिकतेसह दीर्घ कविता लिहिता येतात हा आत्मविश्वास त्यांनीच पुरवला आहे. करन्दीकरांच्या मुक्त सुनितांचा प्रवाह पुढे दिलीप चित्रे, विलास सारंगांपर्यंत झिरपून माझ्या स्वत:च्या कवितांतही पोचला आहे. करन्दीकरांचे आततायी अभंग, त्या अभंगांतील ऐहिकतावाद व मार्क्सवादी दृष्टी आणि दलित कवितेतील यशवंत मनोहरांसारख्या दलित कवीचे अभंग ('उत्थानगुंफा' हा यशवंत मनोहरांचा संग्रह पाहा) व त्यामागील आंबेडकरवादी दृष्टी ह्यांच्यातही एक अस्पष्ट संबंध आहे.

शरद्‌चंद्र मुक्तिबोध यांच्या कवितेतील मार्क्सवादी आशय हा काहीसा चिन्हीय व पुस्तकी होता. करन्दीकरांत तो अनुमानात्मक व जाणीवलक्ष्यी झाला आणि पुढे नारायण सुर्वेच्या कवितेत तो प्रत्यक्ष आणि थेट अनुभव झाला. मुक्तिबोध आणि सुर्वे ह्यांच्यातला दुवा म्हणून करन्दीकरांकडेच पाहावे लागते. अर्थात, मार्क्सवादी दलित कवीपासून ते कलावादी कवींपर्यंत करन्दीकरांचे डोळे प्रत्येकाला कुठे ना कुठे आपले वाटतात, कारण त्यांचे जीवनदर्शन होय.

करन्दीकरांच्या कवितेमागचे जे दर्शन होते ते समग्रलक्ष्यी होते. त्याला काही मध्यमवर्गीय मर्यादा होत्या. पण तरीही त्यांचे प्रयत्न प्रामाणिक होते. त्यामुळेच कवितेला व अनुभवांना विविध अंगांनी भिडण्याची त्यांची पद्धत व ताकद विलक्षण होती. कुठल्याही समग्रलक्ष्यी प्रतिभावंताला समग्रलक्ष्यी असायचे असेल तर त्याचा तत्त्वज्ञानाचा पाया भक्कम असावा लागतो, अन्यथा समग्रलक्ष्यीपणाचे रूपांतर अराजक व विस्कळीतपणात होते. करन्दीकरांचा पाया भक्कम असल्याने ते कधी विस्कळीत वाटले नाहीत. ज्ञानेश्वरांच्या नंतरचा हा मराठीला लाभलेला दुसरा समग्रलक्ष्यी कवी. त्यामुळेच यंत्रावतारातील यंत्रापासून ते 'बकी', 'धोंड्या न्हावी'पर्यंत, 'माझ्या मना बन दगड' पासून ते प्रेमकवितांपर्यंत त्यांच्या कवितेत प्रचंड रेंज आढळते. 'मर्ढेकरांची कविता' ह्या निबंधात त्यांनी बीजकवी व बृहत्कवी अशा संकल्पना मांडल्यात. त्याचाच आधार घेऊन सांगायचे तर ते बृहत्कवी आहेत.

करन्दीकरांनी 'परंपरावादी असणे' आणि 'परंपरेत असणे' या दोन गोष्टींचे वाङ्‌मयीन मूल्य वेगळे मानले. परंपरेचे सामर्थ्य परंपरेशी लढणाऱ्या लेखकाला जितके यथार्थपणे जाणवते तितके ते परंपरावादी लेखकालाही जाणवत नाही. ह्या अर्थाने करन्दीकर कधीच परंपरावादी नव्हते, मात्र केशवसुतांसारखे ते परंपरेपासून कधीच तुटले नव्हते. ते परंपरेत होते आणि त्यांनी परंपरेशी नेहेमी सामना केला. त्यामुळेच नामदेव ढसाळ, नारायण सुर्वे ह्यांनाही ते परके वाटले नाहीत. त्यांनी मराठी काव्यपरंपरा आत्मसात करताना फार डोळसपणे तिची चिकित्सा केली. ह्या बाबतीत माधव ज्यूलीयनांच्या गजलेचा पुढील टप्पा आहे. त्यांची मुक्त सुनिते ही 'तुटलेल्या दुव्या'तील माधवरावांच्या सुनितांचा पुढील टप्पा आहे. माधव ज्युलीयनांच्या फटकळ अभंगांचा थेट प्रभाव आपणाला मर्ढेकरांच्या 'नाठाळ गाथे'वर दिसतो आणि पुढे ह्या 'नाठाळ गाथा' आणि 'फटकळ अभंगां'तून

आपणाला करन्दीकरांचे 'आततायी अभंग' उमटलेले दिसतात. माधव ज्युलीयनांच्या प्रयोगशीलतेचा सांगोपाग विचार करन्दीकरांनीच नंतर केला ह्यात आश्चर्य नव्हते.

करन्दीकरांनी नवतेसंदर्भात म्हटले आहे, एखाद्या विशिष्ट वाङ्मयीन क्रांतीत नवता कोणते स्वरूप घेईल हे पुढील गोष्टींवर अवलंबून असते.

**१) क्रांतिपूर्व कालातील वाङ्मयीन परिस्थिती :** वैद्यकीय भाषेत बोलावयाचे झाल्यास या वाङ्मयाच्या प्रकृतीत तीन प्रकारचे दोष संभवू शकतात : आशयक्षय, रूपक्षय व शैलीक्षय. आशयक्षयाचेही विचारक्षय, भावनाक्षय किंवा संवेदनाक्षय असे पोटभेद करता येतील. संभाव्य नवतेचे स्वरूप या रोगांशी संघर्ष करण्याच्या प्रयत्नांतून निष्पन्न होत असते. या दोषांचा वेध घेता आला (आणि हे फार कठीण असते) तर नवतेच्या संभाव्य स्वरूपाचा स्थूल अंदाज बांधता येतो.

**२) क्रांतिगर्भ कालातील वस्तुनिष्ठ मानवी संदर्भ :** क्रांतिपूर्व अवस्थेतील वाङ्मयाच्या प्रकृतीला न पचणारे सामाजिक वास्तव अस्तित्वात आल्यावाचून वाङ्मयीन क्रांती ही प्रभावी व सामूहिक असे स्वरूप धारण करू शकत नाही, किंबहुना आविष्कृत होऊ पाहणारे नवे वास्तव व त्याच्याशी सहकंप न होऊ शकणारा आशय, घाट व शैली यांसंबंधीची क्रांतिपूर्व कालातील वाङ्मयीन सांकेतिकता यांच्यामधील विलक्षण ताण हाच क्रांतिगर्भ काळातील महत्त्वाचा वस्तुनिष्ठ मानवी संदर्भ होय.

**३) क्रांतिगर्भ कालातील व्यक्तिगत प्रतिभाधर्म :** प्रतिभावंत लेखकांची उपस्थिती ही वाङ्मयीन क्रांतीतील गृहीत गोष्ट आहे. प्रतिभेचा वापर हा पुष्कळ अंशांनी बाह्य घटनांनी नियमित होत असला तरी प्रतिभेचा दर्जा व आवाका या गोष्टी खास व्यक्तिगत व संदर्भशून्य असतात. (उक्त, ७-८)

दुसऱ्या आधुनिक नवतेला लागणारी प्रतिभावंतांची उपस्थिती १९२०-४० ह्या कालखंडात नव्हती, पण १९४० नंतर मात्र मर्ढेकर, मुक्तिबोध असे दिग्गज झाले. विन्दांच्या प्रतिभेच्या उपस्थितीमुळे तिला चारचाँद लागले. विन्दांच्या कालखंडातच रविकिरण मंडळाच्या प्रभावाने व मर्ढेकरांच्या उथळ अनुकरणामुळे आशयक्षय, रूपक्षय व शैलीक्षय असे सारे दोष मराठी कवितेत शिरले. विन्दांच्या प्रतिभेने त्या दोषांचा वेध घेऊन रूपवादाशी फारकत घेतली आणि सामाजिक बांधिलकी मानणारी नवतावादी कविता लिहिली. इतर कवी कालिकतेमुळे निर्माण झालेल्या नावीन्यतेत गुंतले असताना विन्दांनी आपल्या काळाशी थेट नाते जोडले. १९४७ साली भारत स्वतंत्र झाला आणि लोकशाही समाजवादी धोरणाच्या अंगीकाराने पारंपरिक वाङ्मयाच्या प्रकृतीला न पचणारे सामाजिक वास्तव अस्तित्वात आले. म्हणजेच एका अर्थाने विन्दांनी वर उल्लेखलेल्या तिन्ही गोष्टी घडल्या आणि त्यामुळेच ही नवता आपल्या कवितेतून साकार करणे विन्दांसाठी अनिवार्य ठरले. अनेक रूढ झालेले रूपवादी वाङ्मयीन संकेत ठोकरून लावून नवे संकेत शोधणे गरजेचे होते. विन्दांनी हे आव्हान सहज पेलले. एकीकडे त्यासाठी आवश्यक असणारी समीक्षा लिहिली आणि साहित्यनिर्मितीही केली.

कुठल्याही कवीची थोरवी ही फक्त नवतेवर अवलंबून नसते. विन्दांच्याच भाषेत सांगायचे तर, ''नावीन्य हे स्वभावत: अस्थायी असते, नवतेमध्ये स्थायी होण्याची शक्यता अंतर्भूत असते, तर अपूर्वता ही केवलस्वरूपी व कालातीत असते.'' अपूर्वता शोधणारे अनेक कवी नवतेला धूप घालत नाहीत, ते कालातीत असे काहीतरी शोधत असतात. विन्दांच्या काही कवितांत नावीन्य, बऱ्याचशा कवितांत नवता आणि काही कवितांत 'अपूर्वता' आढळते. ह्या अपूर्व कविता मराठीत एका अर्थाने अजरामर आहेत. 'संहिता' 'वेडी' 'मुक्तीमधले मोल हरवले'सारख्या कविता ह्या अपूर्व आहेत.

*घेणाऱ्याने घेत जावे*
*देणाऱ्याने देत जाते*
*घेता घेता एक दिवस*
*देणाऱ्याचे हात घ्यावेत किंवा*
*असा मी तसा मी कसा मी कळेना*
*स्वत:च्या घरी दूरचा पाहुणा मी किंवा*
*माझ्या मना बन दगड*
*किंवा मला सर्वात आवडलेली*
*दिशा किती हे मला अजूनही कळलेले नाही. तरी पण*
प्रत्येक दिशेला बुडण्याइतके पाणी आहे आणि बुडताना
धन्यता वाटावी इतके खोल कुठेच नाही

ह्या त्यांच्या अपूर्व ओळी मराठी भाषेचा सांस्कृतिक ठेवा बनल्यात, त्या कालातील आहेत.

करन्दीकरांची समीक्षा हीही अपूर्व आहे. केशवसूत, मर्ढेकर आणि माधव ज्यूलीयन ह्या कवींची त्यांनी केलेली समीक्षा हा आदर्श समीक्षेचा वस्तुपाठ आहे. ह्या तिघांच्या मर्यादाही त्यांनी निर्भीडपणे मांडल्या. परंपरा आणि नवता ह्यांचा त्यांनी केलेला विचारही महत्त्वाचा आहे. व्यक्तिश:

माझ्यावर त्यांच्या ह्या विचाराचा प्रभाव पडला आहेच, पण येणाऱ्या पिढ्यांनाही नवता आणि कालिकता ह्यांचा सांगोपांग विचार करावा लागेल. कालिकता ही त्या कालखंडातील नावीन्यता अधोरेखित करते आणि त्या त्या कालखंडाची परंपराही! म्हणूनच साठोत्तरी, नव्वदोत्तरी अशा कालिक संकल्पना अभ्यासासाठी आवश्यक असतात, पण खरी क्रांती, खरे परिवर्तन हे नवतेमुळे अधोरेखित होते एवढी बेसिक गोष्ट आपण करन्दीकरांकडून शिकलो तरी खूप झाले. आज चौथ्या नवतेबाबत किंवा चिन्हीय नवतेबाबत मनोज जोशी, सलील वाघ, 'चौतीशीनंतर'चा हेमंत दिवटे, 'ऑल देट आय वॉना डू'तला संजीव खांडेकर, उत्तरकालीन सचिन केतकर, 'महासत्तेचे पीडादान'मधला महेंद्र भवरे ह्यांच्यासारखे काही सन्माननीय कवी वगळता फार थोड्या कवींना भान आहे. अनेकांना नव्वदोत्तरी नावीन्याचीच प्रचंड हौस आहे. त्यांनी करन्दीकरांना त्यांच्या समीक्षेतून भेटणे गरजेचे आहे.

करन्दीकरांच्या प्रतिभेच्या द्रष्टेपणाचे इथे एक उदाहरण द्यावयास हवे. काव्यात्म दुर्बोधता (१९६६) ह्या निबंधात त्यांनी तिसरी काव्यात्म दुर्बोधता म्हणून अरुण कोलटकर यांच्या 'घोडा' ह्या कवितेची चर्चा करताना म्हटले होते, ''(घोड्यासारखा) निरवयवी कविता दुर्बोधता शेवटचा टप्पा मानला तर या कवितेनंतरचे पुढचे स्थित्यंतर विरुद्ध दिशेकडे होईल आणि ते पुढील स्थित्यंतर सोपेपणाच्या बाबतीत पूर्वसूचक असेल असा तर्क करण्याचा मोह होतो.'' (उक्त, पान क्र ७८) खुद्द अरुण कोलटकरांनाही ज्यावेळी त्यांची कविता पुढे सोपी आणि साधी होत जाणार आहे हे कळले नव्हते त्या काळात विन्दांनी केलेले हे भाकीत आहे. परंपरेचाही पहिला नीट विचार नेमाडेंच्या आधी विन्दांनी केला होता आणि केशवसूत हे परंपरेपासून तुटले होते हे परखडपणाने सांगणारे विन्दा हे पहिलेच होते. विन्दांची समीक्षा ही त्यांच्या समकालीनांना पचणारी नव्हती, म्हणूनच ती साईड ट्रॅकला टाकली गेली. सुधीर रसाळ ह्यांच्या 'कविता आणि प्रतिमा' ह्या ग्रंथात विन्दांच्या कवितांची किमान बारा-तेरा अवतरणे आणि कवितांची चर्चा आहे, पण समीक्षाग्रंथाचा उल्लेख फक्त संदर्भग्रंथात आहे. ह्यावरूनच समजणाऱ्यांनी समजून घ्यावे.

माझा करन्दीकरांच्यावरचा हा तिसरा लेख. मागच्या लेखातील मुद्दे मी इथे टाळलेत. त्यांच्या भाषांतर, ललित निबंध व बालकवितांवर आणखी एक स्वतंत्र लेख लिहावा लागेल. हा लेख लिहिताना करन्दीकरांच्या समीक्षादृष्टीचा वापर केला, कारण करन्दीकरांच्या कवितेमागे जे दर्शन आहे ते पारंपरिक माणसाचे नसून परिवर्तनशील माणसाचे आहे हे लक्षात यावे. अन्यथा मराठीतील मंचीय कवी त्यांनाही परंपरेच्या कोंदणात बसवून त्यांचा गणपती करून त्यांचे परंपरेत विसर्जन केल्याशिवाय राहणार नाहीत. मी आधुनिक नवतेमधील फक्त करन्दीकरांवरच इतके का लिहिले असा प्रश्न मला गेली काही वर्षे विचारला जातोय. मला वाटतं, ज्ञानपीठाने त्याचे उत्तर परस्परच दिले आहे.

मी 'अभिधा'त लिहिलेल्या 'प्रिय विन्दा' ह्या लेखात 'आता तुम्हाला ज्ञानपीठ कधी मिळतंय ह्याची वाट पाहतोय' असे लिहिले होते. ज्ञानपीठाने खरेतर उशीर केलाय, पण ठीक आहे, देरसे सही, मगर दुरुस्त तो आये!

ज्ञानपीठ मिळाल्याबद्दल करन्दीकरांचे मनापासून अभिनंदन!

## विन्दा करन्दीकर : पुरवणी

वरील लेख हेमंत साहित्य संमेलनाला अंक काढणार म्हणून लिहून दिला होता. पण काही अपरिहार्य अडचणीमुळे तो पोस्टपोन झाला आणि प्रत्यक्ष संमेलनावेळी 'खेळ'चा एक अंक आला (जानेवारी ०६). ह्या अंकात सलील वाघ ह्या आमच्या कविमित्रच्या 'पादस्पर्श क्षमस्वमे...' ह्या लेखात विन्दांच्या विरोधात जाणारी, पण महत्त्वाची अशी तिसरी प्रतिक्रिया आली आहे.

सलीलचा हा लेख वाचताना मला स्वत:ला मी केशवसुत, करन्दीकर आणि नारायण सुर्वे ह्यांच्यावर केलेली टीका आठवली. काही ठिकाणी तर मी सुर्वेंच्या विरोधात जे मुद्दे मांडले होते तेच करन्दीकरांच्या विरोधी सलीलने मांडलेत (म्हणजे मार्क्सवादी दहशत, आकर्षण वगैरे). सलीलचीही शैली माझ्यासारखीच आक्रमक असल्याने त्याचे मुद्दे खोडून काढण्यासाठी मी आक्रमक झालो तर सलीलने मला माफ करावे.

स्पष्ट सांगायचे तर, सलीलचा काही ठिकाणी आवेगाच्या भरात किंचित तोल गेलाय (आता हे मी सांगणे काहींना विनोदी वाटू शकेल, कारण माझेही असेच होते असे काही जणांचे मत आहे). उदा. ना. धों. महानोर ह्यांना पाडगावकर, सुधीर मोघे व (सर्वात आश्चर्यकारक) संदीप खरे ह्यांच्या गटांत बसवणे. ना. धो. महानोर, नारायण सुर्वे आणि विन्दा करन्दीकर ह्यांनी काव्यवाचने खूप केली असली तरी त्यांनी कधीच मंचीय कविता लिहिलेली नाही, पण मंचावर कविता वाचणे हा गुन्हा असल्याच्या थाटात सलीलने महानोर व करन्दीकरांना मंचीय कवी करून टाकले आहे. त्यामुळे हे

कवी मंचीय होत नाहीत, पण स्वत: सलील, हस्तिदंती कवी असणे हे क्वालिफिकेशन मानतो काय असा प्रश्न निर्माण होतो. आता सलीलचा एकेक मुद्दा. सलील म्हणतो, ''उलट ज्ञानपीठवाल्यांनी हा पुरस्कार ना. धो. महानोर, मंगेश पाडगावकर, सुधीर मोघे किंवा संदीप खरे यांना न देता करंदीकरांना दिला याच्याबद्दल त्यांचे अभिनंदनच करायला हवे!'' पुढे तो म्हणतो, ''विंदा करंदीकर हे गेली पन्नासहून जास्त वर्षे कविता लिहीत असले आणि प्रस्थापित व्यवस्थांनी (प्रस्थापित प्रकाशनसंस्था, प्रस्थापित वृत्तपत्रे, प्रस्थापित साहित्यसंस्था व संस्थाने आदी) त्यांना जरी उचलून घेतलेले असले तरी विन्दा करन्दीकर हे एक प्रस्थापित मध्यमवर्गाचे, मध्यमवर्गीय संवदनेतून जीवनभाष्य करणारे, मध्यमवर्गाला आवडेल आणि मध्यमवर्गीय समीक्षकांनाही सोप्या जातील अशा आणि अशाच कविता लिहिणारे अत्यंत सामान्य प्रकारचे कवी आहेत हे लक्षात घेणे जरुरीचे आहे.''

पहिली गोष्ट, विन्दांच्या कविता ज्या पॉप्युलर प्रकाशनाने प्रकाशित केल्या ते प्रकाशन वा म. टा. सारखा पेपर हेच मुळी विन्दांच्या कवितांवेळी 'प्रस्थापित' नव्हते. सलीलने महाराष्ट्राचा थोडा इतिहास वाचला तरी त्याला हे कळेल. आता मात्र हे लोक प्रस्थापित झालेत ही वस्तुस्थिती, पण उद्या हीच वस्तुस्थिती अभिधानंतर, शब्धवेध खेळ वा सौष्ठव ह्यांच्याबाबत उद्भवू शकते.

दुसरा मुद्दा मध्यमवर्गीय असण्याचा. मी स्वत:ही म्हटलेच आहे की विन्दांची कविता ही मध्यमवर्गीय आणि मध्यममार्गी कविता आहे. पण हाच आक्षेप खुद्द सलील वाघ, हेमंत दिवटे, मनोज जोशी, नितीन कुलकर्णी (निवी) वगैरेंच्यावर घेता येईल. प्रश्न मध्यमवर्गीय असण्याचा नाही, तर हा मध्यमवर्ग बहुजनांशी नाळ जुळवतो की तोडतो हा आहे. आता, विन्दांनी निदान स्वातंत्र्यलढ्यात तुरुंगवास तरी भोगला. नव्वदोत्तरी मध्यमवर्गीय कवींनी तेही केलेले नाही असे कोणी म्हटले तर काय उत्तर देणार? विन्दांच्या सुरुवातीच्या काळात ब्रिटिश प्रशासन हेच प्रस्थापित होते आणि नंतरचा काळ हा स्वतंत्र राष्ट्रनिर्मितीचा काळ होता. १९५०-१९६० ह्या कालखंडात क्रांती किंवा बंड फार महत्त्वाचे नव्हते (कारण स्वातंत्र्ययुद्ध नुकतेच होऊन गेले होते), तर क्रांतीचे वा परिवर्तनाचे अंतर्गत शत्रू टिपणे महत्त्वाचे होते आणि मराठीत विन्दांच्या इतके हे काम इतर कवींनी केले नाही ही वस्तुस्थिती आहे. अगदी, दिलीप चित्रेही अस्तित्ववादाचा स्क्रू पिळण्यात तर कोलटकर घोड्यांची अतिवास्तववादी नाणी पाडण्यात ह्या काळात मग्न होते.

सलील पुढे म्हणतो, ''(कवीला) शब्दांबरोबर, भाषारूपांबरोबर 'लेगवर्क' तर करावं लागतंच, शिवाय कवितेला स्वत:चा असा एक आवाज द्यावा लागतो आणि तो आवाज देण्यासाठी मुळात स्वत:चा आवाज असावा लागतो, विंदा करंदीकरांच्या कवितेत अशा आवाजाचा नेमका अभाव जाणवतो. त्यामुळे विंदांची कविता मध्यमवर्गीय संवेदनांना आणि मध्यमवर्गीय कोमटपणाला साद घालणारी ठरत असली तरी शुद्ध, उत्कट आणि अंतिम मानवी पातळीवर करंदीकरांच्या कवितेचा रेलेव्हंस जाणवत नाही.''

एकीकडे सलील सतत करन्दीकरांच्या मध्यमवर्गीयतेची टर उडवतो आणि त्यांना आवाज नाही असेही म्हणतो. वस्तुस्थिती अशी आहे की, 'स्वातंत्र्यलढ्यात भाग घेऊन, देश स्वतंत्र करून आदर्श देशाची निर्मिती करावयास निघालेल्या; आदर्शवादी पण नंतर ज्याचा आदर्शवाद कोसळू लागला अशा मध्यमवर्गाचा आवाज' हे विन्दांच्या आवाजाचे मुख्य वैशिष्ट्य आहे. विन्दांच्या मर्यादा ह्या मुळात ह्या आवाजाच्या मर्यादा आहेत. शुद्ध, उत्कट आणि अंतिम मानवी पातळीवरचं विन्दांना फार ग्रेट असं काही सापडलेलं नाही असं माझंही मत आहे. मात्र खुद्द विन्दांनीही कुसुमाग्रज प्रतिष्ठान पुरस्कार स्वीकारताना हे मोकळ्या मनाने मान्य केले आहे. सलीलने बहुधा त्यांचे हे भाषण वाचलेले दिसत नाही, मात्र करन्दीकरांची पाटी ह्याबाबत पूर्ण कोरी आहे असे मला वाटत नाही. 'घेता' किंवा 'संहिता'सारख्या त्यांच्या काही कविता काळ ओलांडून जातील असे दिसते. मात्र हे प्रमाण अल्प आहे, विशेषत: मर्ढेकरांच्या तुलनेत. पण हे का घडले ह्याचे जे उत्तर सलील देतो ते दमदार नाही. खरे कारण असे आहे की, मार्क्सवादाचा शुद्ध, उत्कट आणि अंतिमावर ना विश्वास ना त्याबाबत व्याकूळता. त्यामुळे विन्दांना ह्या व्याकूळतेने कधी ग्रासलेले नाही. सर्व प्रश्नांची अंतिम उत्तरे देणारी फिलॉसॉफी निवडली की कवीचे जे होते तेच विन्दांचे झाले आहे. (अर्थात, मार्क्सवादी मानूनही काहींना त्यापुढील प्रश्न पडलेत. उदा. सार्त्र, नेरूदा वगैरे).

सलीलचा करन्दीकरांवर मुख्य आक्षेप जो आहे तो त्यांनी कवितांचे विविध फॉर्म आणि आशयाविषयीचे अनेक प्रकार हाताळेलत त्याबद्दल. सलील म्हणतो,

''एखाद्या खेळाडूनी दोनशे मीटर रिले, हजार मीटर मॅरेथॉन, बुद्धिबळ, फूटबॉल, जलतरण, गोळाफेक अशा सर्व क्रीडाप्रकारांत भाग घ्यावा किंवा नृत्यांगनेनी कॅब्रे, कथ्थक, बॅले, भरतनाट्यम, कुचिपुडी, मुजरा, मोइनीअट्टम, भांगडा, लावणी असे सर्व नृत्यप्रकार करावेत तसे करंदीकरांनी

फॉर्म आणि आशयाविषयीचे अनेक प्रकार हाताळलेले आढळतात. करंदीकरांनी वीररसपूर्ण कविता लिहिल्या, शृंगारकविता लिहिल्या, 'रक्तसमाधी'सारख्या पोर्नोग्राफिक कविताही लिहिल्या, सामाजिक कविता लिहिल्या, बालकविताही लिहिल्या, मार्क्सवादी कविता लिहिल्या ('लाल धूळ' वगैरे), मार्क्सवादीविरोधी कविता (आस्तिकवादी) लिहिल्या, देशीवादी (कोंकण आणले कवितेत वगैरे) कविताही लिहिल्या. सर्व प्रकारच्या वयजातिधर्मलिंगांच्या लोकांना आवडेल अशा 'जो मंगता है वो है' प्रकारे यथेच्छ कविता लिहिल्यानंतर त्यांनी छानसा काव्यसंन्यासही घेतला. इतका अष्टपैलूपणा करून झाल्यावर काव्यसंन्यास घेऊन करंदीकरांनी जो समंजसपणा दाखवला त्याच्या एक शतांशानेही त्यांच्या चाहत्यांनी आणि मराठी कवितेवर चरणाऱ्या त्यांच्या समीक्षकांनी दाखवला नाही.''

पहिली गोष्ट, करन्दीकरांनी देशीवादी कविता लिहिलेल्याच नाहीत. त्यांच्या कवितांत काही प्रमाणात देशीयता आढळते, एवढंच. मुख्य म्हणजे, सलीलला करन्दीकरांचे जे डिसक्वालिफिकेशन वाटते तेच मला त्यांचे क्वालिफिकेशन वाटते. माणूस हा प्राणीच मुळात अनेक फॉर्ममध्ये आणि आशयाच्या अनेक प्रकारांत जगणारा प्राणी आहे. तो सामाजिक प्राणी आहे. घरी आल्यावर मुलांशी त्यांच्याच भाषेत बोलणारा तो कुटुंबवत्सल प्राणी आहे. तो मार्क्सवाद किंवा लोकशाही समाजवादासारख्या तत्त्वज्ञानाशी कमिटेड असलेला प्राणी आहे आणि शृंगारात वेळप्रसंगी पोर्नोग्राफिक होणाराही प्राणी आहे (किंवा ब्ल्यू फिल्म पाहणारा). माणूसच जर आपल्या एका आयुष्यात इतक्या गोष्टी करत असेल तर त्या सगळ्या गोष्टी त्याने आपल्या कवितेत ओतल्या तर ते त्याचे डिसक्वालिफिकेशन कसे ठरू शकते? अगदी क्रीडाप्रकारांतही डेकॅथलॉन नावाचा सगळ्या क्रीडाप्रकारांना सामावून घेणारा क्रीडाप्रकार असतो आणि ऑलिम्पिकचा सर्वोत्कृष्ट क्रीडापटू त्यावरूनच ठरतो. एकीकडे मराठीत चांगले बालवाङ्मय नाही म्हणून बोंबा मारायच्या आणि दुसरीकडे बालवाङ्मय हा फॉर्म किंवा आशयाचा प्रकार मानून ते लिहिणाऱ्याला मोडीत काढायचे हे बरोबर नाही. की, बालवाङ्मय फक्त बालकांनी लिहावे, मोठ्यांनी लिहू नये असे सलीलचे मत आहे!

सलील पुढे म्हणतो —

''ते इंग्रजीचे प्राध्यापक असल्याने आणि मराठी समाजात इंग्रजांच्या मोठेपणाबद्दल मोठ्ठा गंड असणारे लोक त्या काळी बहुसंख्येने असल्याने त्या काळच्या समीक्षक वासरांमध्ये करंदीकरांच्या इंग्रजाळलेल्या समीक्षेची लंगडी गाय मोठी ठरली गेली. मर्ढेकरांनी दुर्बोध समीक्षा लिहिण्याची सुरू केलेली परंपरा जोमदार पद्धतीने पुढे नेण्यात रा. भा. पाटणकर, प्रभाकर पाध्ये, मे. पुं. रेगे आदींच्या बरोबरीने फार महत्त्वाची भूमिका गो. वि. तथा विंदांनी बजावली. ती समीक्षा विंदांना समीक्षकापेक्षा कवी म्हणून एस्टॅब्लिश करायला फारच कामी आली. त्या समीक्षेनी निरर्थक अनाकलनीयतेचा धाक निर्माण केला. मराठी माणूस निरर्थकतेला फार मान देतो, घाबरतो.''

विन्दांची समीक्षा ही दुर्बोध आहे असे मला तरी वाटलेले नाही. त्यांचे अनुवाद दुर्बोध आहेत, पण त्याला ॲरिस्टॉटलचे मूळ लेखन जबाबदार आहे, ते नाहीत. त्यांच्या समीक्षेची दखल घेतली गेली वगैरे सलीलचा कल्पनाविलास आहे. विन्दांच्या समीक्षेची दखल घेणारे तत्कालीन दहा समीक्षक दाखव असे मी म्हणेन. करन्दीकर हे सौंदर्यशास्त्राला कधीही शरण गेलेले नाहीत, मात्र त्याची योग्य ती दखल त्यांनी घेतली. दुसरी गोष्ट, सौंदर्यशास्त्र हे 'कलेचे तत्त्वज्ञान' आहे. आता, कलेचे तत्त्वज्ञान कोणी मांडूच नये असे सलीलला म्हणायचे आहे काय? सलील पुढे म्हणतो,

''विंदांना स्वत:चा चेहरा सापडला तो पाडगावकर, रेगे, बापटांच्या संकुचित मध्यमवर्गीय संवेदनेत. मात्र करंदीकरांची मध्यमवर्गीयता जास्त धूर्त असल्याने ती सहजपणे डावी, उजवी, मधली, व्यक्तिवादी, समष्टीवादी, वेदवादी, प्रचारकी, दलितवादी, संतवादी अशी सर्वसमावेशक काँग्रेसी झाली. औपचारिकतेचा भाग म्हणून यावे लागतात ते शब्द आणि उमटणारी शब्दकळा त्यांच्या कवितेचा बेसिक प्रॉब्लेम इथंच आहे. विंदांना स्वत:ची कविता नाही. विंदांना खास स्वत:ची अशी संवेदनाही नाही. त्यामुळे 'बाय डिफॉल्ट' ती मध्यमवर्गीय कोमट कोमट संवेदनांचा आधार देण्याचा उपचार पार पाडते.''

विन्दांना स्वत:चा चेहेरा पाडगावकर, बापटांच्या संकुचित मध्यवर्गीय संवेदनेत सापडला हे तर सपशेल चूक आहे. उलट पाडगावकर, बापटांनी विन्दांची मध्यमवर्गीय संवेदना संकुचित आणि अतिरोमॅण्टिक करून टाकली. मग विन्दांनी गजला लिहिल्या की पाडगावकरपण गजला लिहिणार. विन्दांनी विरुपिका लिहिल्या की पाडगावकरपण विनोदी कविता लिहिणार असा प्रकार चालू झाला. दुसरी गोष्ट, काँग्रेसला तत्त्वज्ञान नाही हे कोणी सांगितलं? निधर्मी

लोकशाही समाजवाद असे त्या तत्त्वज्ञानाचे नाव. करन्दीकरांच्या काव्यामागेही 'लोकशाही समाजवादा'चे दर्शन आहे. (काँग्रेसचे सत्ताकारण हा वेगळा मुद्दा आहे, पण मग सगळ्याच पक्षांचे सत्ताकारण हा वेगळा मुद्दा आहे). विन्दांची संवेदनाही लोकशाही समाजवादी आहे. आता ती आपल्याला भावत नाही, कारण आपण तिच्यापासून फार दूर आलो आहोत. मुख्य म्हणजे, 'देशी नवते'ने आता असे काही भारून टाकले आहे की ही इंग्रजी कवितेतून आलेली आणि नेहरू मॉडेलने विकसित केलेली संवेदना आता एकदम उपरी वाटायला लागलीय. ह्यानंतर सलीलचे मुद्दे एकत्र घेऊ.

सुर्वे, ढसाळ, नेमाडे, कोलटकर, भाऊ पाध्ये, शाम मनोहर, ग्रेस, सुरेश भट ह्या सगळ्या मर्ढेकरी उल्कापातानंतच्या उल्का होत्या. विंदा ह्यात कुठेच बसत नाहीत, मात्र सगळ्या प्रवाहांच्या काठाकाठाला आढळतात. विंदा हे २०व्या शतकाच्या उत्तरार्धातले कवी आहेत. त्यामुळे त्यांची तुलना करताना त्याच कालखंडातले कवी प्रामुख्याने घेऊन त्यांच्याशी केलेली आहे.

रॉम्यँटिक कवितेच्या बाबतीत विंदांची कविता ही रॉम्यँटिकतेतही उणीच पडताना दिसते. त्यांच्याच कालखंडात लिहिणारे ग्रेस आणि सुरेश भट ह्या रोम्यँटिक कवींनी रोम्यँटिकतेत स्वत:ला झोकून देऊन लांबच पल्ला गाठलेला दिसून येतो. तसा प्रकार विंदांबाबतीत आढळून येत नाही. त्यांच्या रोम्यँटिकतेतही रसरशीतपणा नाही. प्रेमकविताही अशाच 'करू का नको, करू का नको' अशा पद्धतीच्या आहेत. 'मलमली तारुण्य माझे' किंवा 'मालवून टाक दीप चेतवून अंग अंग'सारखा उधळून देण्याचा कलंदरपणा त्यात नाही. त्यांच्या कवितेतला रोम्यँटिसिझम थंड रक्ताचा, कोरडा, फ्रीजमधल्या भाजीसारखा आणि कृत्रिम असतो. विंदांचा (कोकणी) देशीवादही असाच वरवरचा आहे. विंदा कोकणातले असूनही आरती प्रभूंनी जे कोकण मराठीत आणले ते विंदांपेक्षा जास्त भेदक, नेमके आमि तीव्र होते. आरती प्रभूंचे दु:ख जास्त जेन्युईन वाटते.

कोलटकरांची भाषेचे अनेक पडदे आणि चक्रव्यूह भेदण्याची किमयाही त्यांना कधी साधलेली नाही. नेमाडे-ढसाळ यांच्या कवितेसारखी खुल्लमखुल्ला मोकळ्या गळ्यानेही त्यांची कविता कधी रस्त्यावर उतरलेली नाही. समीक्षेतही द. ग. गोडसे, रा. चिं. ढेरे, म. वा. धोंड व मुख्यत: दिलीप चित्रे वगैरेंनी जो एक दैदिप्यमान पल्ला गाठून दिला त्याच्या तर पासंगालाही विंदा (तथा गो. वि. करंदीकर) पुरत नाहीत. विंदांच्या काव्यात्मतेला, काव्यात्म संवेदनशीलतेला कधी आखाड्यातली लाल माती लागलीच नाही, धूळ लागलीच नाही, नाकातोंडात पाणी गेलेच नाही. मशीन समजून घेण्यासाठी तिने आपले हात आणि कपडे काळे कधी केलेच नाहीत. धड ना रोम्यँटिक, धड ना बौद्धिक, ना धड प्रचारकी, ना ध्येयवादी, ना धड स्वत:ची भाषा, ना स्वत:ची विचारसरणी, ना मूल्यसृष्टी अशी त्यांची कविता विचित्र, अर्धवट, एक ना धड भाराभर चिंध्या अशी हास्यास्पद आहे. अगदी 'स्वेदगंगा'पासून ते 'विरुपिकां'पर्यंत सर्व कवितांमध्ये त्या त्या काळी जे जे काव्यप्रवाह व विचारधारा प्रभावी होत्या त्या त्या सगळ्यांचा आवाज ज्यांच्या कवितेत उमटतो, ऐकू येतो. मात्र त्यांचा स्वत:चा आवाज ऐकू येत नाही. विंदा हे संवेदनांना प्रेषित किंवा प्रक्षेपित करणारे प्रतिभावंत नव्हते, तर अशा अनेक आवाजांना, संवेदनांना सहक्षेपित करणारे उपस्टेशन होते.

प्रथम एक गोष्ट — विन्दा करन्दीकर - जन्म १९१८, आरती प्रभू - जन्म १९३०, अरुण कोलटकर - जन्म १९३२, दिलीप चित्रे - जन्म १९३८, भालचंद्र नेमाडे - जन्म १९३८, नामदेव ढसाळ - जन्म १९४२.

सलीलने निवडलेले सर्वच कवी करन्दीकरांपेक्षा नंतरच्या काळातले आहेत.

तर, सलीलने जे मुद्दे घेतलेत त्याचा मुख्य आधारच चुकीचा आहे. मुळात, सलील ज्या कवींशी विन्दांची तुलना करतो ते सगळे विन्दांच्या नंतरचे कवी आहेत, अपवाद मढेकरांचा. मी 'सौष्ठव'च्या २००५ दिवाळी अंकात म्हटल्याप्रमाणे कुठलीही नवता संक्रमण, पूर्व स्थापन आणि स्थापन ह्या तीन अवस्थांतून जाते. औद्योगिक नवतेचे संक्रमण टिपणारा मराठी कवी झालाच नाही. विन्दांचा काळ पूर्वस्थापनेचा काळ आहे. तेव्हा, स्थापन काळातील आरती प्रभू, द.ग.गोडसे, रा.चिं. ढेरे, म.वा. धोंड, दिलीप चित्रे हे विन्दांपेक्षा अधिक देशी, अधिक सरस आहेत ह्यात नवल ते काय? विन्दांचा मुख्य लेखनकाळ १९४० ते १९६० हा आहे. १९६० नंतर मराठीत 'देशी' नवतेचे आगमन झाले आणि स्थापन कालखंडाची सुरुवात झाली. देशीयतेमुळे हे नवे कवी व समीक्षक अधिक पक्व होते. विन्दांच्या आणि ह्यांच्या जन्मात व लेखनकाळात किमान दहा ते वीस वर्षांचे अंतर आहे ह्याचे कसलेही भान सलीलने दाखवलेले नाही. सलीलला मी एक गोष्ट सांगू इच्छितो. 'वाङ्मयाचे समाजशास्त्र' हे त्याने व सगळ्या नव्वदोत्तरी पिढीने नीट अभ्यासणे गरजेचे आहे. त्या त्या कालखंडाचे काही प्रश्न असतात. जर सगळे काम फक्त कवीच्या प्रतिभेने झाले असते तर इ.स.

२०० ते १८०० ह्या दरम्यान निदान एकतरी शोकान्तिका भारतात लिहिली गेली असती. पण एकाही नाटककाराला शोकनाट्य जमले नाही, कारण तशी सामाजिक बंधने होती. करन्दीकर त्यांचा कालखंड ओलांडून जाऊ शकले नाहीत, पण ही मर्यादा कोणाला नसते? शेक्सपीयर, व्यासांच्या एकाही कृतीत घटस्फोट नाही, ह्यात ह्यांचा दोष नाही. देशीयता हे ह्या देशात नेहरू मॉडेल फेल गेल्यानंतर सुचलेले शहाणपण आहे. करन्दीकरांची कविता ही नेहरू मॉडेलची आणि ह्या मॉडेलच्या ऱ्हासाची कविता आहे. खुद्द करन्दीकरांनी,

'दिशा किती हे मला अजूनही कळलेले नाही, पण प्रत्येक दिशा बुडण्याइतके पाणी आहे आणि बुडताना धन्यता वाटावी इतके खोल कुठेच नाही'

असे अगदी कळवळून लिहिले आहे. त्यांच्या काळाची शोकान्तिका त्यांनी केवळ तीन ओळींत धारदारपणे सांगितली आहे. मर्ढेकरांना अशा ओळी सुचलेल्या नाहीत, करन्दीकरांच्या केवळ वाईट कविताच घेऊन त्यांना धोपटण्याचे काम सलीलने केले आहे. 'यंत्रावतार' काय, 'बकी' काय, 'सरोज नवानगर वाली' काय; तशा सामान्यच कविता आहेत. सलील जी मेथड वापरतो ती मेथड वापरून कोलटकरांची 'बबू' नामदेव ढसाळांच्या वेश्यांवरील कवितांपुढे ठेवली तर (मंदाकिनी, उपशम वगैरे) ही 'बबू' चाय कम पानी वाटते. मुळात, ही मेथडॉलॉजीच चुकीची आहे. करन्दीकरांच्या एकाही चांगल्या कवितेचा उल्लेख लेखात नाही. 'घेता', 'संहिता' 'झपताल' ह्या खास करन्दीकरी कविता आहेत.

पुढे सलील म्हणतो ''(करन्दीकरांच्यात) सर्व छटा आढळतात. एखाद्या कवीच्या कवितेत इतक्या सर्व छटा, इतकं सगळं रेडिली अव्हेलेबल असावं हीच खरीतर धोक्याची घंटा असते.''

हा सगळा साठोत्तरीचा पडलेला भंपक प्रभाव आहे. सलील भारतातल्या बहुविधतेला, बहुजिनसीपणाला घाबरला आहे का? करन्दीकरांच्या ह्या सगळ्या छटा पुढे फार व्यापकपणे आणि खोलपणे नामदेव ढसाळमध्ये व्यक्त झाल्या आहेत. नामदेवही विन्दांच्या प्रमाणेच ऑल राऊंडर बहुछटा असलेला आहे. आता, काही जणांना स्वत:ला बहुछटावादी, ऑल राऊंडर होता येत नाही म्हणून अनेक छटांची, ऑल राऊंडर्सचीच त्यांना ॲलर्जी असते, ती सोडा. पण बहुछटांचे अष्टपैलुत्व हा सद्गुण आहे असे आमचे तरी मत आहे.

विन्दांचा खरा प्रॉब्लेम मी 'प्रिय विन्दा' ह्या लेखात मांडला होता. विन्दा काय किंवा मर्ढेकर काय, इंग्रजी परंपरेतून मग भारतीय परंपरेकडे आले. (मर्ढेकरांचे अध्यात्म हे जितके हिंदू आहे तितकेच ख्रिश्चन आहे आणि ह्याचे साक्षात नाते तुकारामांशी कमी आणि ब्लेक हॉपकीन्स ह्यांच्याशी अधिक आहे). विन्दा नंतर येऊनही पुरेसे देशी झाले नाहीत आणि त्यामुळेच त्यांच्या कवितांना मर्यादा पडल्या.

आणि आता शेवटचा 'ज्ञानपीठ'चा मुद्दा—

'आजचा ज्ञानपीठ पुरस्कार म्हणजे, एके काळी मध्यमवर्गीय मराठी संवेदनांवर आरूढ झालेल्या विंदांना काळाची चक्रे उलटी फिरवून 'अ-काली' दिलेला हा पुरस्कार आहे. अशा गोष्टींनी आपला समाज वीस वर्षे मागे जातो.'

पहिली गोष्ट; आपला समाज, आपली वर्तमानपत्रे ह्या वर्तमानपत्रांचे संपादक, साहित्य पुरवणी संपादक साहित्याबाबत मुळात वीस वर्षे मागेच आहेत. इतकेच नव्हे, तर ते लोकप्रिय कमर्शिअल साहित्याची/साहित्यिकांची पाठराखणही करणारे आहेत. तेव्हा, जे मागेच आहेत ते आता आणखी काय मागे जाणार? ज्ञानपीठ मिळाल्याने कदाचित आता पुढच्या पिढीकडे लक्ष जाईल.

दुसरी गोष्ट, माझ्या मते हा पुरस्कार काळाची चक्रे उलटी वगैरे फिरवून अजिबात दिलेला नाही. मराठीला पूर्वी जे दोन पुरस्कार मिळाले ते पहिल्या नवतेला होते आणि कालक्रमानुसार तिसरा पुरस्कार दुसऱ्या नवतेलाच मिळायला हवा होता. प्रॉब्लेम फक्त एकच झाला. तो म्हणजे, विन्दांना हा पुरस्कार १९८०च्या आसपास द्यायला हवा होता आणि चौथा साठोत्तरीतील तेंडुलकर, चित्रे, कोलटकर, ढसाळ, नेमाडे ह्यांच्यापैकी एकाला २०००च्या आसपास द्यायला हवा होता. पण मराठीबाबत तरी कालचक्र फार फार स्लो फिरले. पण ह्यात विन्दा करन्दीकरांचा काय दोष? हा सरळ सरळ ज्ञानपीठासंदर्भात काम करणाऱ्या मराठी फळीचा दोष आहे. वस्तुस्थिती अशी आहे की, मराठीत आजही नवतेपेक्षा कालिकतेचा विचार अधिक होतो. त्यामुळे नवतेचा आवाज क्षीण पडतो. तुम्ही साठोत्तरी, नव्वदोत्तरी वगैरे कालिक शब्द वापरणार. मग ह्यात सुरेश भटांसारखे रोमॅण्टिक लोकही स्वत:ला साठोत्तरी, नव्वदोत्तरी म्हणून घेणार. त्यामुळे पब्लिकमध्ये साठोत्तरी म्हणजे चित्रे, कोलटकर असे समीकरण होण्याऐवजी साठोत्तरी म्हणजे सुरेश भट, ग्रेस, आरती प्रभू असे समीकरण तयार होणार. मग पुढेमागे चौथे ज्ञानपीठ सुरेश भट वगैरेंना मिळाले तर बोंबा कसल्या मारता?

आपली ‘नवता’ ही ‘नवता’ म्हणूनच ठाशीव स्वरूपात मांडायची असते.

सलील पुढे म्हणतो,

‘विदांना मिळालेला पुरस्कार हा एक प्रकारे मराठीच्या आऊटडेटेडपणाला मिळालेला पुरस्कार आहे.’

एक गोष्ट ध्यानात घ्यायला हवी. ज्ञानपीठ किंवा नोबेलसारखे पुरस्कार तुमचे काम झाल्यानंतरच मिळतात. ह्यापुढे जाऊन मी म्हणतो, विन्दाच काय, दुसरी आणि तिसरी नवताही आता आऊटडेटेड झालीये. ती परंपरेचा भाग झालीये, पण आपण हे खरोखर स्वीकारलंय?

ज्ञानपीठ आपल्या भाषेचे काय करते ह्यापेक्षा आपण आपल्या भाषेचे काय करतो हेच सर्वात महत्त्वाचे आहे. अन्यथा क्षुद्र वाङ्मयीन राजकारण खेळायला आणि ह्याला-त्याला दाबायला आपण मराठे फार पूर्वीपासून सोकावलेले आहोतच. आपण ज्ञानपीठसुद्धा निखळपणे एन्जॉय करू शकत नाही. मग ज्ञानपीठ मिळवण्यासाठी दिल्लीत निखळ फिल्डिंगा काय लावणार? करन्दीकरांना पंचवीस वर्षे उशीर झाला, कारण तिथेही काही मराठे करन्दीकर कसे अपात्र आहेत हे सांगणारे असणारच. दुय्यम आणि उथळ लोकांना नेतृत्व देणे आणि मग त्यांच्या हाती निर्णयक्षमता येऊन त्यांनी आपल्या भाषेचे प्रतिनिधी म्हणून बाहेर आपल्या भाषेचे नाक कापले की हळहळणे ह्यात नवीन काय आहे? आपल्या पायांखाली काय जळतंय हे आपण सर्वांनी नीट पाहिलं तर आपल्या तथाकथित बुध्दिवादाच्या चिंध्याच जळताना दिसण्याची शक्यता जास्त आहे. असो.

आणि आपल्या चौथ्या नवतेच्या पिढीबाबतचा प्रश्न. आपलं भांडण नेमकं कोणाशी आहे?

१) दुसऱ्या नवतेशी? आधुनिकवादाशी?

२) तिसऱ्या नवतेशी? देशीवादाशी?

३) की १९८० नंतर फोफावलेल्या ऱ्हासकालीन

मंचीय संस्कृतीविरुद्ध? मंचीय कवींशी? ह्या मंचीय स्कूलचा प्रारंभ बापट-पाडगावकर-करन्दीकर ह्यांनी केला हे तर उघड सत्य आहे. तोपर्यंत मंचीय विचारमंचावर कविता गायली जायची. ह्या लोकांमुळे काव्यगायन जाऊन काव्यवाचन सुरू झाले, पण काव्यवाचन चुकीचे आहे असे सलीलला म्हणायचे आहे काय? की सलीलला पुन्हा मंचावर रविकिरण मंडळाचे काव्यगायन आणायचे आहे? मला वाटते, सलीलला हे निश्चितच अभिप्रेत नाही. म्हणजे, ह्या तिघांनी सुरू केलेल्या ‘काव्यवाचन’ ह्या गोष्टीला सगळ्यांचीच मान्यता आहे. मतभेद आहेत ते मंचाला साधन समजायचे की साध्य? याबाबत. आणि मला वाटते, ह्या तिघांच्यात करन्दीकर हे मंचाला ‘साधन’ तर पाडगावकर, बापट हे ‘साध्य’ समजत होते. त्यामुळे ज्या मंचीय प्रवृत्तीचा आपण निषेध करतो तिला आपण ‘पाड बा’ प्रवृत्ती असे नवीन नाव देउया आणि तिच्या विरोधात उभे ठाकुया. करन्दीकर, ना. धों. महानोर, नारायण सुर्वे, हे ह्या ‘पाड बा’ (म्हणजे मंचासाठी कविता पाड बा म्हणणारे) संस्कृतीच्या पोटात समांतर चळवळ चालणारे वीर होते. हे एका अर्थाने शिवाजी मन्दिरला छबिलदासचे प्रायोगिक नाटक करत होते, आता, कोणाला छबिलदासची नाटके शिवाजी मन्दिरात करताच कामा नयेत असे म्हणायचे असेल तर वाद खुंटला. वस्तुस्थिती अशी आहे की, ह्या तिघांच्यामुळे काही प्रमाणात का होईना, नवी कविता मराठी रसिकांपर्यंत पोचली, अन्यथा ‘पाडबा’ संस्कृतीने मराठी कवितेची वाट लावून तिची लोणची आणि पापड केले असते. आपल्याकडचा ९९ टक्के रसिक हा पुस्तके वाचण्याऐवजी ऐकणेच पसंद करतो. ही परखड वस्तुस्थिती आहे. लोकांना आजही ‘मौखिक’ परंपरेमुळे कविता ऐकणेच आवडते. इथे आजही रामायण, ज्ञानेश्वरीची ‘पारायणे’ चालतात, खाजगी ‘वाचने’ नाही हे जेवढ्या लवकर आपण समजून घेऊ तितके करन्दीकरांचे ‘काव्यवाचन’ आपणाला समजेल.

राहता राहिला प्रश्न दुसऱ्या किंवा तिसऱ्या नवतेशी नातं जोडण्याचा. तर, दुसरीप्रमाणे फक्त मार्गी मार्गी करणे किंवा तिसरीप्रमाणे फक्त देशी देशी करणे ही दोन्ही टोके आहेत. खरा मध्यममार्ग हा मार्गी, देशी, पोटी, ‘जमाती’ ह्या चारही गोष्टींचे समतोल भान राखणे आणि नवता ही नेहमी अवकाशात आलेल्या नव्या बाह्य व आंतरिक परिवर्तनामुळेच अवतरते हे नीट समजून घेणे हा आहे.

■

UTI

**Front Inside Cover**

# साठोत्तरी लेखक/कवींची महत्त्वाची प्रकाशने

**भाऊ पाध्ये यांच्या श्रेष्ठ कथा**
(दुसरी आवृत्ती)
*संपादक : दिलीप पुरुषोत्तम चित्रे* / रुपये १७५

**मनोहर ओकच्या ऐंशी कविता**
*संपादक : चंद्रकांत पाटील, तुळसी परब*
रुपये ५०

**अरुण कोलटकरांची कविता :**
**काही दृष्टिक्षेप** (समीक्षा) / (दुसरी आवृत्ती)
*संपादक : वसंत पाटणकर* / रुपये १००

**कुबडा नार्सिसस** (कविता)
*तुळसी परब* / रुपये १००

**साहित्य, संस्कृती आणि जागतिकीकरण**
(चौथी आवृत्ती)
*भालचंद्र नेमाडे* / रुपये १०

सतीश काळसेकर यांचे तीन कवितासंग्रह
**विलंबित** / रुपये ५०
**साक्षात** / रुपये ३०
**इंद्रियोपनिषद** / रुपये ४०

## कवितासंग्रह

**शुन:शेप** / वसंत आबाजी डहाके / ४० रु. / दुसरी आवृत्ती

**स्वत:च्या समजुतीकरिता** / नीलकंठ कदम / २५ रु.

**संभवी** / शरद साटम / १०० रु.

**अरुणचंद्र गवळीच्या कविता** / अरुणचंद्र गवळी / ८० रु.

**पुन्हा दीर्घ कविता** / रजनी परुळेकर / ४० रु.

**सखी** / मेधा सामंत / ४० रु.

**उत्कट जीवघेण्या धगीवर** / प्रज्ञा लोखंडे / ८० रु.

**शक्तिपाताचे सूत्र** / मंगेश नारायणराव काळे / २०० रु.

**दहशतीची दैनंदिनी** / सुहास जेवळीकर / ७५ रु.

**प्रश्नचिन्ह** / गोविंद गायकवाड / ३० रु. / दुसरी आवृत्ती

**रॉकगार्डन** / अरुण काळ / ८० रु.

**खेळखंडोबाच्या नावानं...** / प्रवीण बांदेकर / ५० रु.


*लोकांसाठी लोकवाङ्मय*
लोकवाङ्मय गृह
भूपेश गुप्ता भवन, ८५, सयानी रोड
प्रभादेवी, मुंबई - ४०० ०२५
दूरध्वनी : २४३६ २४७४ / फॅक्स : २४३१ ३२२०
e-mail : lokvang@mtnl.net.in


**Back Inside Cover**